|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

वर्ष : १३ अंक : १६ सोमवार दि. २८ एप्रिल २०२५ ते रविवार दि. ४ मे २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com **महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक** crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## आंतरजातीय विवाहाचा वाद पेटला फार चिडलेल्या भावजीने मेव्हण्याला केले ठार

अमरावती/क्राईम रिपोर्टर

सामाजिक दृष्ट्या प्रगल्भ असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात आजही जातीयवादी घटना घडत आहेत. ऑनर किलिंगचे प्रकार सुरु आहेत. अंतर जातीय विवाहांना विरोध केले जात आहेत. एका तरुणीच्या आंतरजातीय विवाहाला तिच्या भावाचा विरोध होता. त्यावरून तो सतत कुटुंबातील लोकांशी तसेच बहिणीच्या नवऱ्याशी वाद घालायचा. अखेर चिडलेल्या बहिणीच्या पतीने मेव्हण्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. कुटुंबीयांच्या टोकाच्या विरोधामुळे आंतरजातीय ...पान २ वर

## वाढदिवस ठरला काळ दिवस एक ज्योत विझून गेली ४ वर्षाच्या मुलीचा जीव घेऊन आईने आत्महत्या केली

नवी मुंबई/क्राईम रिपोर्टर

सधाच्या युगात माणसाकडे भलेही पैसा आला, पण पैशांच्या मागे धावताना माणूस आपले मानसिक स्वस्थ हरवून बसला आहे. जे दुसऱ्याकडे आहे ते आपल्यालाही मिळायला हवे अशी वृत्ती माणसांमध्ये बलवत चाललेली असल्याने तो प्रत्येक गोष्टीत स्पर्धा करू लागलाय. अशावेळी माणूस या स्पर्धेत मागे पडला आणि त्याला जे हवे ते मिळाले नाही की तो अस्वस्थ होतो. त्याच्यात चीड चीडेपण येते त्यातून तो शीघ्रकोपी बनतो. छोट्या छोट्या छोट्या गोष्टीचा त्याला राग येतो. आपला हा राग जेंव्हा तो कुटुंबातील लोकांमध्ये काढायला लागतो, तेंव्हा कुटुंबाची सुखशांतीही हरवून जाते. शीघ्रकोपी बनलेला हा माणूस पुढे मनोरुग्णा सारखा वागू लागतो. अशा वेळी त्याच्या हातून काहीही घडू शकते. मानसिक स्वस्थ हरवलेल्या माणसाला नातीगोती दिसत नाहीत. अशावेळी कुटुंबातील इतर लोकांनी खासकरून कुटुंबप्रमुखांनी दुर्लक्ष करू नये. आपल्या कुटुंबातील एक प्रमुख व्यक्तीचे मानसिक स्वस्थ हरवले आहे आणि त्याला मानसिक उपचारांची गरज आहे हे लक्षात घेवून त्याच्यावर चांगल्या मनोवैज्ञानिकाकडून उपचार करून घ्यायचे असतात. पण पैशांच्या मागे धावणाऱ्या कुटुंब प्रमुखाकडे वेळच नसल्याने त्याचे दुर्लक्ष होते. पण त्याच्या याच दुर्लक्षामुळे घरात एखादी भयंकर घटना घडू शकते. वास्तविक आई आणि मुलीचे नाते हे शब्दात वर्णन करण्यापलीकडचे असते. जन्मदाती आई मुलांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपत असते. अशी वात्सल्यमुर्ती आई आपल्याच मुलाचा कसा काय खून करू शकेल. पण अशा घटना घडत आहेत. कारण जेंव्हा आईचे मानसिक स्वस्थ बिघडते. तिला कुठल्या तरी गोष्टीचा त्रास होतो आणि त्यातून जेंव्हा ती शीघ्रकोपी बनते, तेंव्हा मनातला राग ती मुलांवरही काढते. नवी मुंबईत अशाच एका घटनेत एका महिलेने मुलीच्या वाढदिवशीच तिचा जीव घेऊन स्वतःही आत्महत्या करून आपले जीवन संपवले. या घटनेने नवी मुंबईतील घणसोली परिसर हादरून गेला आहे.




घणसोलीतील विवाहितेने आपल्या ६ वर्षीय मुलीची हत्या केल्यानंतर स्वत: आत्महत्या केल्याची बुधवारी रात्रीची घटना ताजी असतानाच तळोजा भागात राहणाऱ्या विवाहितेने देखील आपल्या ४ वर्षीय मुलीची उशीच्या सहाय्याने तोंड दाबुन तिची हत्या केल्याची व त्यांनतर स्वत: गळफास घेऊन आत्महत्या केल्याची उघडकीस आली आहे. मानसिक तणावामुळे आलेल्या नैराष्येतुन या विवाहितेने हा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. तळोजा पोलिसांनी या घटनेतील मृत विवाहितेविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे. दरम्यान, नवी मुंबईच्या हद्दीत आईने मुलीची हत्या केल्यानंतर स्वत: आत्महत्या केल्याच्या लागोपाठ दोन घटना घडल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. ङ्मया घटनेतील मृत विवाहितेचे नाव सोनम अभिषेक केणी (३०) असे असून तिच्या मृत मुलीचे नाव देव्यांशी केणी (४ वर्षे) असे आहे. सोनम, पती अभिषेक केणी व मुलगी देव्यांशी यांच्यासोबत तळोजा फेज–१ मधील पेठाली गावात राहत होती. गुरुवारी दुपारी सोनमने जेवण केल्यानंतर ती बेडरुममध्ये झोपण्यासाठी गेली होती. यावेळी तिचा पती बाहेर गेला होता. याच कालावधीत घरामध्ये मुलीसह असलेल्या सोनमने आपल्या मुलीची उशीच्या तोंड दाबून तिची हत्या केली. त्यानंतर तीने देखील गळफास घेऊन आत्महत्या केली. ङ्मसायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सोनमच्या पतीने तिच्या मोबाईलवर वारंवार संपर्क साधला मात्र, ती फोन उचलत नसल्याने त्याने घरी धाव घेतली. त्यानंतर त्याने बंद असलेले बेडरुम उघडून पहाणी केली असता, सोनम गळफास घेतलेल्या स्थितीत तर मुलगी बेशुद्धावस्थेत आढळुन आली. त्यामुळे त्याने तत्काळ दोघांना रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी दोघांना दाखलपुर्व मृत घोषीत केले. ...पान २ वर

## घराच्या वाटणीचे फक्त निमित्त ठरले जन्मदात्या बापाने मुलाला ठार मारले



मयत बाळू

जळगाव/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणूस इतका स्वार्थी बनला आहे कि पैसा, धन संपत्ती यासाठी तो कोणत्याही थराला जावू शकतो. संपत्तीच्या वादात रक्ताच्या नात्याचेही बळी जाऊ लागलेत. जळगाव जिल्ह्यातील बाळद गावी अशाच एका घटनेत घराच्या वाटणीत धाकटा मुलगा जास्त हिस्सा मागतो म्हणून बाप बेट्यात वाद सुरु होता. हा वाद पुढे इतका वाढला कि चिडलेल्या बापाने आपल्या मोठ्या मुलाच्या मदतीने धाकट्या मुलाची हत्या केली आणि आपले हे पाप लपवण्यासाठी मुलाचा घरावरून पडून अपघाती मृत्यू झाल्याचा बनाव केला. पण पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला व आरोपी बापाला त्याच्या मोठ्या मुलासह अटक केली.



आरोपी राजेंद्र



आरोपी भारत

आपल्या मुलांचे आयुष्य सुखात जावे, त्यांना जीवनात विशेष श्रम पडू नये यासाठी काही पालक राबराब राबून चल–अचल संपत्ती जमवतात. अनेक पिढ्यांना वारसा हक्काने चल–अचल संपत्ती मिळत असते. मात्र हिच संपत्ती कित्येकदा वादाचे आणि हिंसेचे कारण देखील बनते. संपत्तीच्या वादातून कित्येक अप्रिय घटना घडतात. त्यात एकजण दुसऱ्याच्या जीवावर उठतो आणि खूनासारखी घटना घडते. मुलांना चांगले शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले तरी पुरेसे असते. मात्र वारसा हक्काची अथवा पालकांनी कष्टाने उभी केलेली संपत्ती नंतर वादाचे कारण होत असल्याच्या घटना आपण बघतो. मोठमोठ्या सुसंस्कृत घरांमधे देखील अशा वादाच्या घटना घडत असतात. त्यातून एकत्र कुटूंब विभक्त होतात. अशाच मालमत्तेच्या वादातून पित्याने आपल्याच थोरल्या मुलाची धाकट्या मुलाच्या मदतीने हत्या केल्याची





घटना जळगाव जिल्ह्याच्या भडगाव तालुक्यातील बाळद या गावी घडली. भडगाव पोलिसांच्या सतर्कतेने या घटनेतील अपघाताचा बनाव आणि खूनाचा गुन्हा उघडकीस आला. भडगाव तालुक्यातील बाळद खुर्द या गावी राजेंद्र रामचंद्र शिंदे हे आपल्या परिवारासह रहात होते. त्यांना भारत आणि बाळू अशी दोन मुले होती. भारत हा मोठा तर बाळू हा त्यांचा लहान मुलगा होता. राजेंद्र शिंदेयांचा लहान मुलगा बाळू हा नेहमी त्यांना त्यांच्या घराच्या वाटणीत ...पान २ वर

## मंगलच्या मागे आप्पासोचा त्रास वाढला प्रियकराला सांगून दिराचा काटा काढला

कोल्हापूर (कोडोली)/क्राईम रिपोर्टर



शरीरसुख ही प्रत्येक माणसाची गरज असते. अशावेळी एखाद्या विधवा महिलेला शरीरसुखाची चटक लागली कि मग ती नातीगोती बघत नाही. कर्नाटकातील मोले गावात रहाणाऱ्या आप्पासो याच्या भावाचे निधन झाल्याने त्याची भावजय विधवा झाली होती. त्यामुळे आप्पासो याने आपली विधवा भावजय मंगल बरोबर अनैतिक संबंध सुरु केले. मात्र एके दिवशी आप्पासोच्या पत्नीने दोघांना एकांतात बघितले आणि आपला पती व भावजयची खरडपट्टी काढली. आपल्या अनैतिक संबंधाचे बिंग फुटल्याने मंगल हिने दिराचा नाद सोडला आणि गोंडप्पा बरोबर संबंध जोडले. हे आप्पासोला समजताच तो भावजय मंगला हिला शिवीगाळ करू लागला. गोंडप्पाला सोड असे सांगू लागला. त्यामुळे चिडलेल्या मंगल हिने आपला प्रियकर गोंडप्पा याला सांगून दिराचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

कोल्हापुर जिल्हयातील प्रसिध्द असे जोतिबाचे देवस्थान. या देवस्थाला रोज हजारो लाखेच्या संख्याने भाविक येत असतात. शनिवार दि. १९ एप्रिल २०२५ रोजी पहाटे दोन ...पान २ वर

## जिवलग मित्राने योजना आखली विखारी पोलिसाच्या हत्येची पोलिसालाच दिली सुपारी

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



मयत ज्ञानेश्वर

आजकाल माणसाने जवळचा नातेवाईक असो कि जिवलग मित्र असो कोणावरही डोळे झाकून विश्वास ठेवू नये. कारण जवळचा माणूस कधी केसाने गळा कापेल याचा नेम नाही. बुलढाणा जिल्ह्यातील गिरोली गावात अशीच एक घटना घडली. पोलीस खात्यात नोकरी करणाऱ्या ज्ञानेश्वर म्हस्के यांची गावातील माजी सरपंचाशी मैत्री होती. ज्ञानेश्वर आपले पैसे बाबासाहेब नावाच्या या माजी सरपंचाकडे शेतीत गुंतवणुकीसाठी द्यायचा, त्यामुळे त्याचे ज्ञानेश्वरच्या घरी येणे जाणे असायचे पण बाबासाहेबांची ज्ञानेश्वरच्या पत्नीवर वाईट नजर होती. पण ती त्याला भाव देत नव्हती. त्यामुळे बाबासाहेबांनी ज्ञानेश्वर याचाच काटा काढण्याचा निर्णय घेतला. कारण त्याला ज्ञानेश्वरने दिलेले पैसेही हडप करायचे होते. त्यामुळे त्याने ज्ञानेश्वरच्या हत्येची एका निलंबित पोलिसाला सुपारी दिली आणि संधी साधून ज्ञानेश्वरची हत्या केली. तसेच हत्या लपवण्यासाठी त्याच्या हत्येचा अपघात झाल्याचा बनाव केला. पण चाणाक्ष पोलिसांनी बाबासाहेबाचा प्लान उध्वस्त करून त्याला त्याच्या साथीदारांसह अटक केली.





देऊळगाव राजा शहरापासून सात किलोमीटर अंतरावर असलेले गिरोली हे ज्ञानेश्वर पांडुरंग म्हस्के (वय ४२) यांचे मूळ गाव. ज्ञानेश्वर मस्के हे जालना महामार्ग पोलीस म्हणून कार्यरत होते. ते कुटुंबासह अंबड रोड जालना येथे रहायचे. त्याच्या कुटुंबात म्हातारी आई, पत्नी, १३ वर्षीय मुलगी, ८ वर्षीय मुलगा होता. त्यांची आई गावात रहात होती. ज्ञानेश्वर यांचे त्यांच्या गावातील बाबासाहेब शामराव मस्केसोबत मित्रत्वाचे संबंध होते. ज्ञानेश्वर गावात आले म्हणजे बाबासाहेबाकडे वेळ घालवत असायचे. ज्ञानेश्वर यांचा बाबासाहेबावर खूप विश्वास होता. बाबासाहेब गावात सरपंच राहिलेला वजनदार व्यक्ती होता. ...पान २ वर

## खुनी पतीच्या पापाचा भरला घडा आठ तासात हत्येचा लागला छडा



विरार/क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंधाचा शेवट वाईटच असतो. कारण असे संबंध कुटुंबाची बदनामी करणारे असतात. त्यामुळे जेंव्हा हे संबंध उघडकीस येतात तेंव्हा बदनामी टाळण्यासाठी त्याचा शेवट केला जातो. विरारमध्ये अशाच एका घटनेत अनैतिक संबंधातून भंगार गोळा करणाऱ्या एका महिलेची तिच्याच पतीने हत्या केली. विशेष म्हणजे अवघ्या ८ तासात विरार पोलिसांनी या हत्येचा पर्दाफाश करून आरोपीला अटक केली.

अनोळखी महिलेच्या खूनाचा अवघ्या आठ तासात छडा लावण्याची कामगिरी गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी केली आहे. ही माहिती जनसंपर्क अधिकारी व सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी बुधवारी दिली आहे. विरार पुर्व येथील नरेश पाटील यांच्या वाडीत एका अनोळखी महिलेच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात ...पान २ वर

## संपत्तीच्या वाटणीचा वाद विकोपाला गेला पत्नीने पोलीस महासंचालकांचा खून केला





बंगळूरू (कर्नाटक)/क्राईम रिपोर्टर

**कौटुंबिक संपत्तीची जर योग्य वाटणी झाली नाही तर त्यावरून निर्माण झालेला वाद कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशावेळी माणूस नातीगोती बघत नाही. निवृत्त पोलीस महासंचालक ओमप्रकाश यांनी आपल्या संपत्तीतील काही भाग बहिणीला दिला. त्यामुळे त्यांची पत्नी भयंकर चिडली आणि दोघांमध्ये वाद सुरु झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की चिडलेल्या पत्नीने सतत रिव्हॉल्वर काढून धमकी देणाऱ्या पती ओमप्रकाश याची चाकूने वार करून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**

कर्नाटक राज्याचे माजी पोलीस महासंचालक ओमपक्राश हे मुळचे बिहार राज्यातील चंपारण्य जिल्हयातील होय. सन १९८१ साली ते आयपीएस अधिकारी बनले. ते आयपीएस अधिकारी झाल्यानंतर कर्नाटकातील बळ्ळारी, जिल्हयातील हरपनहल्ली येथे एएसपी म्हणून त्यांनी आपल्या कार्यकिर्दीला सुरूवात केली. सन १९८३ साली त्याचा पल्लवी हिच्याशी विवाह झाला. त्यानंतर त्यांनी शिवमोगा, कारवार, चिक्कमंगळुरू जिल्हयात जिल्हा पोलीस अधिक्षक म्हणून काम केले. कर्नाटक राज्य लोक आयुक्तमध्ये राज्य दक्षता कक्षाचे ...पान ६ वर

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला पत्नीच्या प्रियकराचा पतीनेच गेम केला





इस्लामपुर/क्राईम रिपोर्टर

पहिले प्रेम माणूस सहसा विसरत नाही. त्यामुळे लग्नानंतरही प्रियकर –प्रेयसी यांच्यात संबंध सुरु राहतात. पण असे अनैतिक संबंध हानिकारक ठरू शकतात. इस्लामपूर मधील सौरभ केर्लेकर या डीजे ऑपरेटरचे नयना नावाच्या तरुणीशी प्रेमसंबंध होते. पण नयनाचे पुढे राघु साटम बरोबर लग्न झाले. योगायोगाने राघूची नयनाच्या पतीशी ओळख झाली आणि ते दोघे चांगले मित्र बनले. त्यामुळे सौरभचे नयनाच्या घरी येणेजाणे सुरु झाले आणि त्यांचे पूर्वीचे प्रेम पुन्हा बहरून आले. मात्र याची कुणकुण राघूला लागताच सुरुवातीला त्याने पत्नीला आणि तिचा ...पान ६ वर

## मुलीवर केला बलात्कार भयंकर गुन्हा बापाचा २१ वर्षांनी सापडताच उलगडा झाला पापाचा






वसई/क्राईम रिपोर्टर

**कोणत्याही गुन्ह्यातील आरोपी किती जरी हुषार असला तरी पोलीस त्याच्या मागावर असतात आणि कधीना कधी तो पोलिसांना सापडतो. कारण खुनासारखा गंभीर गुन्हा सहसा कुणालाही पचवता येत नाही. अशा गुन्ह्यात फरारी असलेल्या आरोपीला भलेही काही वर्ष लपून राहण्यात यश आले तरी त्याच्या पापाला कधीना कधी वाचा फुटते आणि पोलीस त्याच्या मुसक्या आवळतात. सावत्र मुलीवर बलात्कार केल्यानंतर पत्नीची हत्या करून फरार झालेला आणि नाव लपवून धारावीत रहात असलेल्या एका शातीर गुन्हेगाराला पोलिसांनी तब्बल २१ वर्षांनी अटक केली.**

सावत्र मुलीवर बलात्कार तसेच पत्नीची हत्या करून फरार झालेल्या एका आरोपीला २१ वर्षानंतर गुन्हे शाखा दोनच्या पथकाने अटक केली आहे. साजिद अली शेख उर्फ परवेज उर्फ इडली असे या आरोपीचे नाव आहे. आपले नाव बदलून तो धारावीच्या झोपडपट्टीत राहत होता. आरोपी साजिद अली शेख हा ट्रक चालक आहे. तो विरार मध्ये राहत होता. त्याने एका महिलेची लग्न केले होते. त्याला अठरा वर्षाची सावत्र मुलगी होती. साजिद या मुलीला ...पान ६ वर

# वसई विरारच्या विकास कामांबाबत खासदार व आमदारांची पालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक

विरार/प्रतिनिधी

पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा व आमदार राजन नाईक यांच्या उपस्थितीत वसई विरार शहर महापालिकेत विकासकामे आणि महत्वाच्या विषयांवर आढावा घेण्यासाठी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्वपूर्ण निर्णय झाले असून प्रलंबित विकास कामांना यामुळे गती मिळणार आहे. वसई विरार महापालिका क्षेत्रात विकास कामांचा आढावा घेऊन कामांना गती देण्यासाठी आमदार राजन नाईक यांनी खासदार डॉ.हेमंत सवरा यांच्या अध्यक्षतेखाली काल २३ एप्रिल रोजी पालिका मुख्यालयात आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीबाबत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष व प्रसिद्धीप्रमुख मनोज बारोट यांनी माध्यमांना माहिती दिली. ते म्हणाले, ह्या महत्त्वपूर्ण बैठकीत महापालिका, रेल्वे, महामार्ग (NHA), महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पावसाळ्यात वसई बुडू नये म्हणून आमदारांनी सुरुवातीला पावसाळ्याआधी करावयाची कामे, त्यात नाले सफाई, नाले रुंदीकरण यावर चर्चा झाली.



यामध्ये अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीमध्ये कमतरता निदर्शनास आले असता त्यात सुधार करण्याच्या सूचना दिल्या. पावसाळापूर्व सर्व कामे जलद गतीने पूर्ण केली जातील, पाणी साचू नये यासाठी उपाययोजना केल्या जातील असे अधिकाऱ्यांनी सांगितले. नुकतेच सुरू झालेली विरार ते सफाळे रो-रो फेरीत यात्रा करणाऱ्या यात्रिंना कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये म्हणून त्या मार्गावर पथ दिवे, रस्ते व यात्रिंना ये-जा करण्याकरिता परिवहन सेवा तत्काळ सुरू करण्याच्या सूचना आ. राजन नाईक यांनी केल्या. त्याचप्रमाणे मागील अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेल्या म्हाडा -विरार स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे काम ३० जून पर्यंत तर नालासोपारा पूर्व शंखेश्वर नगर येथील नाट्यगृह ३१ मे पर्यंत पूर्ण करण्याचे वाचन पालिका प्रशासनाने या बैठकीत उपस्थित आमदार व खासदार यांच्या समोर दिले आहे. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व नाट्यगृह ही दोन्ही कामे सुनिश्चित वेळेत ठेकेदारांनी पूर्ण केली नाहीत, तर त्यांना काळ्या यादीत टाका अशी कड़क सूचनाही आमदारांनी आयुक्तांना दिली आहे. वसई विरार मधील अनेक इमारतीतील रहिवाशांना १०-१२ वर्षाआधी शतप्रतिशत पाणी कर भरूनही पाणी मिळालेले नाही. परंतु आता पाणी उपलब्ध झाल्यावर त्यांच्याकडून पुन्हा अतिरिक्त पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्क घेण्याचा निर्णय महापालिकेने २० फेब्रुवारी रोजी प्रशासकीय ठराव मंजूर करुन घेतला आहे. हा निर्णय म्हणजे नागरिकांवर होणारा अन्याय आहे. त्यामुळे हा निर्णय तत्काळ रद्द करण्यात यावा अशी सूचना आयुक्तांना आ. नाईक यांनी केली. ही मागणी आयुक्तांनी मान्य करत, जुन्या इमारतींना कोणतेही वाढीव शुल्क लागणार नाही असे म्हणत, वाढीव शुल्काचा निर्णय रद्द करण्याचे जाहीर केले. त्यामुळे जुन्या इमारतींना नळ जोडण्या मंजूर होण्याचा मार्ग मोकळा झाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मनपाद्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासिका व वाचनालयांची अव्यवस्था व वाढीव फी याबद्दल आमदारांनी आयुक्तांना माहिती दिली असता, सर्व ठिकाणी तत्काळ सुव्यवस्था करण्याचे व वाढीव फी रद्द करण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. नालासोपारा पश्चिम येथील मार्केटसाठी आरक्षित जागेवरील अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी तत्काळ मार्केटची व्यवस्था करण्यात यावी, याबाबत आयुक्तांनी पाहणी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले. राष्ट्रीय महामार्गावरून शहराला जोडणाऱ्या तिन्ही मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण व खोदकामामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे ही सर्व मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे तत्काळ हटवण्यात यावित व रस्ते दुरूस्ती करावी अशी सूचना केली आहे. दरवर्षी बौद्ध पौर्णिमाच्या दिवशी साजरा केला जाणारा वसई विजय उत्सव आनंदाने साजरा करण्याकरीता योग्य नियोजन करण्याच्याही सूचना आमदारांनी दिल्या. त्याचप्रमाणे अनेक जन समस्यांबद्दल सकारात्मक चर्चा झाली. त्यामध्ये प्रथम महापौर राजीव पाटील यांचा प्रशासकीय अनुभवांमुळे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. खा. डॉ. हेमंत सवरा यांनी आयुक्तांना सूचना दिल्या की, केंद्र सरकारशी निगडीत जी काही कामे प्रलंबित असतील त्यांची माहिती देण्यात यावी, जेणेकरून त्या कामांचा पाठपुरावा करून सर्व कामे मार्गी लावता येतील. ह्यावेळी खा. डॉ. सवरा यांच्यासह वसई विरार शहर मनपा आयुक्त अनिलकुमार पवार, अति. आयुक्त संजय हेरवाडे, आ. राजन नाईक, प्रथम महापौर राजीव पाटील व शिवसेना तालुका प्रमुख सुदेश चौधरी तथा अन्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# डॉ. पूनम नाथानी दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी रुजू

लातूर/प्रतिनिधी



येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा पदभार डॉ. पूनम नाथानी यांनी स्वीकारला. याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितभाई शहा, रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहसचिव मा.ॲड. श्रीकांत उटगे, अजिंक्य सोनवणे, महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड. आशिष बाजपाई, सीए सुदर्शन भांगडिया यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कारभारात अधिक गतिमानता येईल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे. डॉ. पूनम नाथानी या विधि शाखेतील एक अनुभवी आणि प्रतिष्ठित प्राध्यापिका आहेत. त्या विविध शैक्षणिक पदांवर यशस्वीपणे काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विधि क्षेत्रात उत्कृष्ट यश संपादन केले आहे. त्यांच्याकडे शिक्षण आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. त्यांच्याकडे असणारे प्रशासकीय कौशल्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव महाविद्यालयासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास व्यक्त होत आहे. डॉ. नाथानी यांनी प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. डॉ. पूनम नाथानी यांच्या नियुक्तीमुळे विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात नवनवीन मापदंड स्थापित करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना; ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या पहिल्या लकी ड्रॉ मधील २०० विजेत्यांना बक्षिसांचे वितरण




कल्याण/प्रतिनिधी

महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने ७ एप्रिलला काढण्यात आला आहे. या लकी ड्रॉ मध्ये कल्याण परिमंडलात पहिल्या क्रमांकाचे ४० तर दुसऱ्या क्रमांकासाठी ८० व तिसऱ्या क्रमांकासाठी ८० असे एकूण २०० विजेते जाहिर करण्यात आले आहेत. विजेत्या ग्राहकांची माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून त्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात येत आहे.

कल्याण परिमंडलात ४० उपविभाग असून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक या प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ४० विजेत्या ग्राहकांना सॅमसंग कंपनीचा स्मार्ट फोन दुसऱ्या क्रमांकासाठी ८० विजेत्या ग्राहकांना रेडमी कंपनीचे स्मार्ट फोन व तिसऱ्या क्रमांकासाठी ८० विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस देण्यात येत आहे. यापुढील लकी ड्रॉ मे व जून महिन्यात काढण्यात येणार असून आणखी ४०० बक्षिसे जिंकण्याची संधी परिमंडलातील ग्राहकांना आहे. महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन किंवा तीन पेक्षा अधिक वीज बिले ऑनलाईन पध्दतीने भरणाऱ्या ग्राहकांना योजनेच्या लाभाची संधी आहे. एप्रिल- २०२३ ते मार्च- २०२४ या कालावधीत ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही, अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीज ग्राहकांसाठी ही योजना आहे. रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे. महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरणचे मोबाईल ॲप विविध पेमेंट वॉलेटच्या माध्यमातून नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस आदींद्वारे वीजबिलाचा ऑनलाईन भरणा सुलभ व सुरक्षित आहे. ऑनलाईन वीजबिल भरणा करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या वीजबिलावर ०.२५ टक्के सवलत देण्यात येते. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# जिल्ह्यात ४ तालुक्यातील ६ गाव आणि ५५ पाड्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई

पालघर/प्रतिनिधी



पालघर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून जिल्ह्यातील जलाशयातील पाण्यामधून मुंबई, वसई, मिरा भाईंदर अशा शहरी भागातील नागरिकांची पाण्याची तहान भागवली जाते. असे असताना पाणी वितरणाचे योग्य नियोजन नसल्याने तसेच जलजीवन मिशनचे काम अतिशय मंदगतीने सुरू असल्याने जिल्ह्यातील पूर्व भागात असलेल्या मोखाडा, जव्हार, विक्रमगड, वाडा तालुक्यातील सहा गावे आणि ५५ पाड्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. जिल्ह्याच्या पूर्व भागात असलेल्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या तालुक्यात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होते. धामणी, वैतरणा, अप्पर वैतरणा अशी शहरी भागाला पाणी पुरवठा करणारे जलाशय सुद्धा याच भागात आहेत. तरी सुद्धा जानेवारी महिना सुरू होताच या भागात पाणीटंचाई ला सुरवात होते. मोखाडा जव्हार भागात जानेवारी महिन्यातच पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी टँकर सुरू करण्यात आले होते. वाढती उन्हाची काहिली आणि भूगर्भातील पाणी कमी होत असल्याने एप्रिल महिना सुरू होइपर्यंत पूर्व भागातील चार तालुक्यातील सहा गाव आणि ५५ पाड्यामध्ये पाण्याची तीव्र टंचाई सुरू झाली आहे. या भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जिल्हा प्रशासनाने १९ पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. १९ टँकर च्या माध्यमातून दररोज ५० पेक्षा अधिक फेऱ्यांच्या माध्यमातून पिण्याचे पाणी पुरवले जात आहे.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने जलजीवन मिशन कार्यक्रम सुरू केला होता. या योजनेअंतर्गत प्रत्येक महिलेच्या डोक्यावरील हंडा उतरवणे व प्रत्येक घरात नळाने पाणी पोहचवले जाणार होते. जिल्ह्यात सर्वत्र या योजनेचे काम सुरू आहे. या योजनेसाठी शेकडो कोटी रुपये खर्च होत असले तरीही योग्य नियोजन, जलजीवन योजनेतील भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची उदासीनता यामुळे अजूनही पाणीटंचाई ची समस्या सोडवण्यात अपयश आले आहे. एकीकडे जलजीवन मिशन वर कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत तर दुसरीकडे टँकर वरही कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. टँकर द्वारे नागरिकांना काही प्रमाणात पाणी मिळत असले तरी पाळीव प्राणी, जंगलातील प्राणी यांना पिण्याचे पाण्याचा प्रश्न कायम आहे. जलजीवन मिशन ची सुरू असलेली कामे वेगाने पूर्ण करावीत. उच्चपदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी सुद्धा या कामात लक्ष घालून ही कामे वेगाने पूर्ण करू घ्यावीत अशी मागणी नागरिक करत आहेत. जलजीवन अंतर्गत कामांचा आढावा संबंधित गटविकास अधिकारी यांनी घ्यावा व झालेल्या कामाचा दर्जा तपासावा असे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सुचित केले आहे. यासंदर्भात पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी पत्रकारांशी बोलताना असे सांगितले की मागच्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्याही कमी झाली असल्याची दिसून आले आहे. पुढच्या वर्षी टँकर मुक्त हे चार तालुके केले जातील असे नियोजन सध्या सुरू असल्याची माहिती दिली.

# निकृष्ट कामाची चौकशी करा, ग्रामस्थांनी दिला उपोषणाचा इशारा



देवणी/प्रतिनिधी

देवणी शहरातील प्रभाग क्रमांक १५ मध्ये लुले यांच्या घरापासून ते अजिज तांबोळी यांच्या घरापर्यंत सि सी नालीचे बांधकाम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून, नाली बांधकाम हे अंदाजपत्रक नुसार होत नाही. तसेच रस्त्याचे मोजमाप न करता काही प्रमाणात कामे करण्यात आली आहे. सदरील कामावर नगरपंचायतीचे अभियंता यांनी एकदाही कामावर आले नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच करण्यात आलेले निकृष्ट दर्जाचे नाली बांधकाम हे पाडून परत करण्यात यावे यासाठी प्रभाग क्रमांक १५ मधील नागरिकांनी नगरपंचायत कार्यालय समोर सोमवार पासून उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. सदरील निवेदनाची प्रत हे जिल्हाधिकारी लातूर, तहसीलदार देवणी यांना देण्यात आली आहे. या निवेदनांवर दयानंद महानुरे, जमीर मोमीन, महताब कुरेशी, रमेश खताळ, विवेक महाणुरे यांच्यासह वीस ते पंचवीस लोकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चाकू हल्ल्या करून फरार आरोपीच्या आवळल्या मुसक्या

भिवंडी/प्रतिनिधी



भिवंडी शहरातील न्यू आझाद नगर येथे घराबाहेर उभ्या असलेल्या दुचाकीवर बसलेल्या युवकाच्या हातावर फटका मारून मोबाईल फोडल्यावर हातात चाकू घेऊन हल्ला करणाऱ्याला शांतीनगर पोलिसांनी गावी पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीस मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून अटक करण्यात यश मिळवले आहे. मेराज उर्फ पिंकी मेहमुद शाह असे अटक आरोपीचे नाव आहे.

अख्तर हुसैन अन्सारी हा त्यांचे घरासमोर पार्क केलेल्या दुचाकीवर बसुन मोबाईल बघत असतांना आरोपी मेराज उर्फ पिंकी मेहमुद शाह याने अख्तर याच्या हातावर फटका मारला. यामध्ये हातातील मोबाईल खाली पडून फुटला.त्याचा जाब अख्तरने विचारला असता त्याचा राग येऊन आरोपी मेराज याने आपल्या जवळील चाकूचा धाक दाखवून अख्तर या शिवीगाळ करीत धक्काबुक्की केली. त्यावेळी तेथे असलेले मित्र मोहम्मद कैफ दिलनवाज शेख, इरफान अन्सारी हे मध्यस्थी करून वाद मिटवत असतांना आरोपी मेराज याने हातातील चाकु जीवे ठार मारण्याचे उद्देशाने इरफान अन्सारी याचे डोक्याचे मधोमध पाठीमागील बाजूस जोरात वार करून जखमी केले. यावेळी झटापटीत मोहम्मद कैफ शेख याच्यासुद्धा डोक्यावर चाकूने वार केला. तर अख्तरची आई वाचविण्यासाठी गेला असता तिला सुद्धा दुखापत केली. या गुन्ह्यानंतर आरोपी तेथून फरार झाला होता. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी आरोपीच्या शोधासाठी पथक तयार केले होते. पथकातील पोलिस शिपाई प्रशांत बर्वे, रोशन जाधव यांना गुप्त बातमीदारा कडून आरोपी उत्तरप्रदेश येथे पळून जाण्या साठी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकात गेल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरेश चोपडे, पथकातील कर्मचारी पोउपनिरी रविंद्र आव्हाड, रिझवान सैय्यद, निलेश महाले, प्रशांत बर्वे, रोशन जाधव, भुषण पाटील, दिपक सानप व छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस, मुंबई येथील रेल्वे पोलिसांच्या मदतीने आरोपी मेराज उर्फ पिंकी मेहमुद शाह यास अटक केली आहे. त्याला भिवंडी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे.

# पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर पालघर जिल्ह्यात सागरी सुरक्षा वाढवली




पालघर/प्रतिनिधी

पहलगाम येथे घडलेल्या अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यात सागरी सुरक्षेचे उपाय अधिक बळकट करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व सागरी पोलीस ठाण्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, गस्त व देखरेख अधिक तीव्र करण्यात आली आहे. पालघर सागरी घटकात सध्या चार गस्त नौका असून, त्यापैकी एक नौका कार्यरत आहे आणि ती नियमित सागरी गस्त करत आहे. एक नौका स्थानिक दुरुस्तीदाराकडे दुरुस्तीसाठी दिली असून, उर्वरित दोन नौकांच्या आधुनिकीकरणासाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. त्या दोन्ही नौकांचे दुरुस्ती काम सुरु आहे. सुरक्षेच्या उपाययोजनेचा एक भाग म्हणून मत्स्यविभागाच्या सहकार्याने दोन ड्रोनच्या साहाय्याने खाडी किनाऱ्याची देखरेख केली जात आहे. या ड्रोन पेट्रोलिंगवर स्थानिक पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून सतत लक्ष ठेवले जात आहे. आवश्यकतेनुसार खाजगी बोटींचाही सागरी गस्तीसाठी वापर करण्यात येत आहे. तसेच भारतीय तटरक्षक दल, मत्स्यविभाग, महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड, कस्टम विभाग आणि पोलीस दल यांच्या संयुक्त सागरी गस्तीद्वारे सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत केली जात आहे. सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून जिल्ह्यातील लँडिंग पॉइंट्स, कोस्टल पोस्ट्स आणि संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. पहलगाम घटनेनंतर जिल्ह्यातील सर्व सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सागर रक्षक दल, सुरक्षा रक्षक, स्थानिक मच्छिमार सोसायट्या व मच्छिमार यांच्याशी संपर्क ठेवून, संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पालघर नियंत्रण कक्ष व स्थानिक पोलीस ठाण्याला कळवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# औसा तालुक्यातील १०९ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण जाहीर

औसा/प्रतिनिधी

औसा तालुक्यातील वर्ष २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी १०९ ग्रामपंचायतीचे सरपंच पदांचे सामाजिक आरक्षण जाहीर करण्यात आले असून तालुक्यातील एकूण विविध प्रवर्गातील १०९ गावांच्या आरक्षणासाठीची सोडत प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे आणि तहसीलदार घनश्याम अडसूळ यांनी अतिशय पारदर्शकपणे कार्य करत राजकीय पक्ष आणि नागरिकांचे समाधान केले

आरक्षण सोडत पूर्ण झालेल्या ग्रामपंचायतीची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुला प्रवर्ग अशा विविध गटांमध्ये विभागण्यात आली आहे. औसा तालुक्यातील १०९ ग्रामपंचायतमध्ये अनुसूचित जाती महिला ०९ अनुसूचित जमाती महिला ०१ नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला १४ व खुला महिला २९ जागा सोडण्यात आली.

एकंदरीत १०९ पैकी ५३ जागेवर सरपंच म्हणून महिलाराज असणार आहे अनुसूचित जाती (महिला) : लिंबाळा दाऊ, हरेगाव, शिवणी लख, कण्हेरी, चलबुर्गा, सारोळा, जमालपूर, याकतपूर, एकंबी.अनुसूचित जाती : पारधेवाडी, धानोरा, चिंचोली सोन, टाका, हासेगाव, मंगरूळ, समदर्गा, वरवडा, शिवली. अनुसूचित जमाती (महिला) : भंगेवाडी /महादेववाडी. अनुसूचित जमाती: लोहटा नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) : अपचुदा गांजनखेडा महाळुंब्रा/तुंगी बु., बुधोडा हसलगन / संक्राळ, दापेगाव येळी / देवंप्रा, तावशी ताड, कोरंगळा, किनीनवरे, आलमला, दावतपूर, तुंगी खु., भेटा, नागरिकांचा मागास प्रवर्ग : हिप्परसोगा, खुटेगाव, एरंडी, शिवणी बु., ऊटी बू, रामेगाव, कुमठा/ कुमठा तांडा ब्रहानपूर हळदुर्ग, बिरवली, चांगजी, जवळगा पो., कमालपुर, सेलू, किनीघोट, नांदुर्गा.

सर्वसाधारण (महिला): हासाळा, मसलया खु. बोरगाव न., लोदगा, गोंद्री, होळी, भुसणी, तांबरवाडी / राजेगाव, लामजना, चिंचोली तपसे, उत्का, करजगाव, बेलकुंड, गुळखेडा, पेल्लोरीबाडो, शिंदाळा लो., कवठा केन, सत्तरधरवाडी, हिप्परगा कवळी, माळकोंडाजी, सारणी, गुबाळ, आंनदवाडी / जाऊवाडी, मोगरगा, लखनगाव, उजनी, आंदोरा, वडनी, काळमाथा.

सर्वसाधारण : हासेगाव वाडी, शिंदाळा जहागीर, कलठा लातूर तोडोळी, उंबडगा चू। उबडगाव, जयनगर, खरोसा, कारला कारला सांडानावळी मुगळेवाडी, येळवट, वियोली जोगण, फतेपुर, आशिव, चिंचोली काजळे, वातवडा, बोरफळ खानापूर, एकंबी तांडा, मासुर्वी, जायफळ, मातोला, देवताला, किल्लारी, तळणी, शिरसल, बाणेगाव, चापोली, नागरसोगा, शिंदाळवाडी, कवळी.

क्राईम Reporter

क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

9890718873

# इस्लामी दहशतवाद जगावरचे विनाशकारी संकट!

धर्म ही अफूची गोळी आहे. आणि ज्याला या गोळीचे व्यसन लागले आहे.तो माणूस राहतं नाही.कारण त्याच्या नसानसात धर्मांधतेचे विष भरलेले असते.असा माणूस सायको बनलेला असतो. कारण तो धर्माशिवाय कसलाही विचार करीत नाही. असा माणूस एका विशिष्ठ दहशतीखाली वावरत असतो. आपला धर्म संकटात आहे असे त्याला नेहमी वाटत असते. त्यामुळे धर्म वाचवणे हे एकच त्याच्या डोक्यात असते.त्यासाठीच त्याला धर्मांदतेची शिकवण देणाऱ्यांनी त्याच्या हाती शस्त्र दिलेले असते. आज जगात असे लाखो धर्मांध सायको खुलेआम हाती शस्त्र घेऊन फिरत आहेत .यात इस्लामी दहशतवाद्यांची संख्या ९९ टक्के आहे.आणि वेगवेगळ्या दहशतवादी संघटनांमध्ये हे सायको सक्रिय आहेत.त्यामुळे जगाला या धर्मांद मुस्लिम सायकोंचा मोठा धोका आहे.पण दुर्दैवाने जगात ९/११ आणि २६/११ सारखे मोठे दहशतवादी हल्ले होऊनही अमेरिका रशिया, ब्रिटन, फ्रान्स यांच्यासारख्या महासत्ता दहशतवादी हल्ल्यानंतर फक्त कागदी घोडे नाचवत आहेत. शांततेची कबुतरे उडवत आहेत.पण दहशतवाद्यांवर निर्णायक कारवाई करण्यासाठी पुढे येत नाही. आताही पहलगाम मध्ये पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. २७ निरपराध लोक मारले गेले. त्यानंतर अमेरिका रशियासह सर्वच मोठ्या देशांनी या हल्ल्याचा निषेध केला आणि कारवाईसाठी भारताला पाठिंबा दिला. पण पुढाकार घेतला नाही.किंवा भारतानेही २४ तासात कोणतीही मोठी लष्करी कारवाई केली नाही. त्यामुळे दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या पाकिस्तानने उलट भारताला उघड आव्हान दिले आहे की, आमच्यावर हल्ला झाल्यास त्याला आम्ही मुहतोड जबाब देऊ. पाकिस्तानची ही अरेरवी त्यांची कबर खोदणारी आहे. पण त्यांच्यात एवढे सहज आले कुठून? हाच खरा प्रश्न आहे. आणि या प्रश्नांची उत्तर या हल्ल्याच्या निषेधार्थ कागदी घोडे नाचवणाऱ्या सर्वच राष्ट्रांनी द्यायला हवे. वारंवार दहशतवादी हल्ले करणारा पाकिस्तान या जगात असावा की नसावा या प्रश्नावर जेव्हा जग विचार करेल. आणि दहशतवादाविरुद्ध प्रॅक्टिकली एकत्र येऊन पाकिस्तानचा नायनाट करील. तेव्हाच जगातून दहशतवादाचे कायमस्वरूपी उच्चाटन होऊ शकेल. जगात ८४ इस्लामी राष्ट्र आहेत. उद्या पाकिस्तानवर जर लष्करी कारवाई केली तर ही राष्ट्र पाकिस्तानच्या मदतीला धावतील अशी काही ना भीती वाटते. परंतु तसे होणार नाही एक तुर्की सोडला आणि काही प्रमाणात पॅलेस्टाईन मध्ये सक्रिय असलेला हमास सोडला तर कुठलेही इस्लामी राष्ट्र पाकिस्तानच्या मदतीला धावून येईल असे वाटत नाही. तसे असते तर आज पाकिस्तानची अवस्था भिकाऱ्यापेक्षाही वाईट झालेली असताना, कुठल्याही मुस्लिम राष्ट्राने पाकिस्तानला मोठी आर्थिक मदत दिलेली नाही. उलट काही राष्ट्रांनी आपल्या देशात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना हाकलून लावले आहे. ही सर्व पार्श्वभूमी पाहता पाकिस्तानवर लष्करी कारवाई झाल्यास कोणी त्यांच्या मदतीला धावतील अशी जगातील कुठल्याही देशाने भीती बाळगू नये. आणि म्हणूनच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पाकिस्तान वर निर्णायक हल्ला करणे आणि जगाच्या नकाशावरून पाकिस्तानचे कायमस्वरूपी उच्चाटन करणे हाच दहशतवाद संपवण्याचा एकमेव मार्ग आहे. ज्याबाबत भारताने आणि जगातील सर्वच राष्ट्रांनी विचार करायला हवा. कारण इस्लामी दहशतवाद मध्य आणि पश्चिम आशियामध्ये किती मोठ्या प्रमाणात फोफावला आहे आणि त्याने जगाला कसे वेठीस धरले आहे, याचा तरी विचार करून जगाने इस्लामी दहशतवाद कायमचा संपवण्यासाठी पाकिस्तान वर लष्करी कारवाई करायला हवी. कारण इस्लामी दहशतवादाच्या भीतीने, जगातील अनेक राष्ट्रांना आपला लष्करी बजेट वाढवावा लागतोय. त्यावर अब्जावधी रुपये खर्च होत आहेत. विनाकारण शस्त्रसाठा केला जातोय. केवळ इस्लामी दहशतवादाच्या भीतीने! म्हणूनच या इस्लामी दहशतवादाचा कायमचा बीमोड करायचा असेल तर पाकिस्तानवर कारवाई करायला हवी कारण पाकिस्तान दहशतवादाचे मूळ आहे आणि अनेक दहशतवादी संघटना पाकिस्तानात सक्रिय आहेत. तिथे त्यांची लष्करी कॅम्प आहेत. पाकिस्तानकडून सांगितले जाते की आम्हीही दहशतवादाचे बळी आहोत. पण ते तितकेसे खरे नाही. याचे कारण पाकिस्तानने जरपेरले ते उगवले. भारताच्या द्वेषा पोटी पाकिस्तानने इस्लामी दहशतवादाचा भस्मासुर उभा केला. आज या भस्मासुराचा पाकिस्तानसह सर्व जगाला त्रास होतोय. त्यामुळे हा भस्मासुर असाच ठेवायचा त्याचा कायमचा नायनाट करायचा? याचा विचार दहशतवाद विरोधी भूमिका घेणाऱ्या जगातल्या सगळ्या राष्ट्रांनी करायला हवा. दहशतवाद विरोधी भूमिका केवळ कागदोपत्री असता नये. तर ती प्रॅक्टिकली असायला हवी. तरच ही डोकेदुखी कायमस्वरूपी संपुष्टात येईल. अन्यथा पहेलगाम मध्ये जसा दहशतवादी हल्ला झाला, तसेच दहशतवादी हल्ले जगाच्या इतर भागांमध्ये ही होऊ शकतात. आणि दहशतवादी इतके निर्ढावलेले आहेत की त्यांनी अमेरिकेलाही जुमानले नाही. अमेरिकेतील ९/११ चा हल्ला हा त्याचा पुरावा आहे. म्हणूनच जगातून दहशतवादाचे कायमचे उच्चाटन करणे ही काळाची गरज बनली आहे. जगाचा विकास हा परस्परांच्या सहकार्याने होतो. अशावेळी जगावर जर एखादे मोठे संकट आले असेल तर त्याचा मुकाबला करण्यासाठी संपूर्ण जगणे एकत्र यायला हवे. अशावेळी राजकारण आणि हिसंबंध बाजूला ठेवायचे असतात. इस्लामी दहशतवादी हे धर्मांध जिहादी आहेत. त्यांना या जगात केवळ इस्लामच हवा आहे. त्यामुळे इतर धर्मियांचा ते द्वेष करतात याच द्वेषातून पहलगाम हत्याकांड आणि ९/११ तसेच २६/११ चे हल्ले घडले आहेत त्यामुळे इस्लामी दहशतवाद जिवंत ठेवणे म्हणजे जगाच्या विनाशाला आमंत्रण देण्यासारखे आहे. अशावेळी इस्लामी दहशतवाद मुळासकट उखडून टाकण्यासाठी या दहशतवादाचे उगमस्थान असलेल्या पाकिस्तानचा नायनाट करणे आवश्यक आहे अजूनही वेळ गेलेली नाही पाकिस्तान सीरिया, तुर्की, इराण, लेबनॉन यासारख्या दहशतवाद्यांना पोसणाऱ्या देशांचे समूळ उच्चाटन करणे हे जगातील दहशतवाद विरोधी लढ्यात सामील असलेल्या प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे.

# आंबा बाजारातील ग्राहकांची फसवणूक

सध्या महाराष्ट्रात आंबा सीझन जोरात सुरू आहे. मुंबईच्या वाशीचे अेपीएमसीच्या बाजारात सुमारे एक लाख आंब्याच्या पेट्यांची आवक होत असून पुणे, कोल्हापूर, सांगली इ. ठिकाणीसुद्धा आंबा सीझन जोरात असल्याचे चिन्ह दिसत आहे. सध्या मुख्यत्वे हापूस आंब्याची मोठी आवक होत असून केसर, पायरी, रत्ना इ. जातीचे आंबेही काही प्रमाणात पहायला मिळतात. भारतीय समाजामध्ये आंब्याची फार लोकप्रियता असून सर्व थरातील लोक आपल्या आवडीनुसार तसेच खिशाला परवडेल अशा आंब्यांची खरेदी करतात. कोकणातील हापूस आंब्याला सर्वांची पसंत असते. परंतु बाजारामध्ये काही फसवणुकीचे प्रकारही होत असल्याचे आढळते. यामध्ये मुख्यत्वे दोन प्रकारची फसवेगीरी आढळते. पहिला म्हणजे कोवळ्या आंब्याला कॅल्शियम कार्बोनेटची मात्रा लावून पिकविणे. आणि दुसरी म्हणजे कोकणातील हापूसच्या नावाखाली कर्नाटकातील हापूसची विक्री करणे याबाबी आहेत.

फळे पूर्ण परिपक्क होण्यापूर्वी बाजारातील चांगला दराचा फायदा घेण्यासाठी अपरिपक्क फळांना कॅल्शियम कार्बोनेट ची मात्रा देतात. यासाठी कॅल्शियम कार्बोनेट पावडर च्या पुड्या आंब्याच्या पेटीत ठेवतात. हवेतील आद्रतेने कॅल्शियम पावडरमधून सिटिलन गॅस निर्माण होतो. या सिटिलीन गॅसमुळे आंबा किंवा केळी सारख्या अपरिपक्क फळामध्येसुद्धा पिकण्याची क्रिया सुरू होणे आणि आंब्याच्या फळाचा हिरवा रंग जाऊन चांगला पिवळसर आकर्षक रंग येतो. त्यामुळे फळे आतून पिकलेली नसूनसुद्धा फळाच्या बाहेरील आकर्षक रंगाने गिऱ्हाइकाची फसवणूक होते अशा फळांची चव नैसर्गिकपणे पिकलेल्या आंब्याच्या तुलनेत फारच अपूरी असते आणि ग्राहक फसतात. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे अपरिपक्क फळे पिकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कॅल्शियम कार्बोनेटच्या मधून उत्पन्न होणाऱ्या सिटिलीन गॅसमुळे कॅन्सरसारखी भयानक रोगसुद्धा होण्याची शक्यता असते. त्यामुळे आंबा, केळी किंवा इतर कोणतीही फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बोनेटच्या वापरावर सरकारने



(FSSI) २०११ मध्ये बंदी घातली आहे. तरीपण चोरटेपणाने आंबा, केळी यासारखी अपरिपक्क फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बोनेटचा वापर केला जातो आणि त्यामुळे ग्राहकाची फसवणूक होते. अशी फसवणूक टाळण्यासाठी शासकीय यंत्रणेने बाजारामध्ये फळांची नमुने घेऊन प्रथक्करण करून दोषी लोकांना शिक्षा केली पाहिजे. बाजारामध्ये मोसमाच्या सुरुवातीच्या काळात अधिक दराचा फायदा घेण्यासाठी मुख्यत्वे कॅल्शियम कार्बोनेटचा वापर करतात. त्यामुळे ग्राहकाची फसवणूक होते. कोणती फळे कॅल्शियम कार्बोनेट वापरून पिकवलेली आहेत हे केवळ वरकरणी देखाव्यावरून कळत नसल्याने ग्राहकाची फसवणूक होते. हे टाळायचे असेल तर सरकारी यंत्रणा याबाबतीत अधिक सज्ज असणे आवश्यक आहे.

हापूस आंब्याच्या उत्तम चव, स्वाद, दिखाऊपणा यामुळे हापूस आंब्याला बाजारात जास्त मागणी असते. तसेच दरही अधिक मिळतात. विशेषतः कोकणातील (सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पालघर) आंब्याची चव, स्वाद आणि तेथील विशिष्ट जमीन हवामान उत्पादनाच्या विशिष्ट पद्धती यामुळे हापूस आंब्याला, मुळ विशिष्ट प्रकारचा उत्तम चव, स्वाद, रंग असतो म्हणून कोकणातील आंब्याला G-I मानांकन दिलेले आहे. हापूस आंबा लागवडीपासून चांगला नफा मिळत असल्याने महाराष्ट्राच्या कोकणाबाहेरील काही जिल्ह्यांत तसेच कर्नाटकाच्या उत्तरेकडील धारवाड, बेळगाव, कोप्पल, हावेरी इत्यादी जिल्ह्यांमध्ये तसेच तामिळनाडूतील काही जिल्ह्यांमध्ये लागवड केलेली असून तेथील हापूस फळे महाराष्ट्रातील मुंबईच्या मुख्य मंडईमध्ये तसेच काही मोठ्या शहरामध्येही विक्रीसाठी येत आहेत. कोकणाशिवाय इतरत्र ठिकाणी हापूसची लागवड करून अधिक उत्पादन जरी मिळाले तरी हापूस आंब्यांना कोकणातील विशेषतः देवगड भागातील हापूस आंब्याच्या तोडीची चव, स्वाद, रंग इ. येत नाही. तरी सुद्धा कोकणाबाहेरील हापूस आंब्यापासून कोकणातील हापूस उत्पादकांचे संरक्षण करण्यासाठी कोकणातील हापूस आंब्याला Alphanso Geographical identification (G-I tag) Geographic indication Registry या केंद्रीय सरकारच्या व्यापार विभागातर्फे सन १९९९ च्या कायद्यानुसार दिलेले आहे.

कोकणाबाहेरील कर्नाटकासारख्या भागातून उत्पादित झालेले हापूस कोकणातील हापूस विशेषतः देवगड हापूस म्हणून विकले जात आहेत. त्यामुळे हापूस नावाखाली खरेदी केलेल्या ग्राहकाची मोठी फसगत होत आहे. तसेच कोकणातील खरे जी-आय मानांकित हापूस आंबा उत्पादकांचे मोठे नुकसान होत आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी कोकणातील सर्व हापूस आंबा उत्पादकांनी आपल्या मालावर हापूसचे जी-आय टॅग लावणे जरूरीचे आहे. तसेच हापूस आंबे खरेदी करणाऱ्या ग्राहकानेही आंबे खरेदी करताना अधिक चौकशी करून हापूस आंबे खरेच कोकणातील उत्पादित आहे का? याची खात्री करून आंबे विकत घेतले पाहिजेत. हा प्रश्न सोडविण्यासाठी अधिक प्रभावी अशा ब्लॉकचेन, स्मार्ट टॅग, क्यूआर कोड इत्यादी मार्गाचा अवलंब करता येऊ शकतो. परंतु कोकणातील हापूस उत्पादक शेतकरी तसेच हापूस आंबा खरेदी करणाऱ्यांनाअधिक जागरूक राहणे गरजेचे आहे.



**- डॉ. आर. टी. गुंजाटे**
**(जगविख्यात फलोउद्यानतज्ज्ञ)**

# केंद्रीय जनजाती विद्यापीठ विशाखापट्टनम येथे परीक्षा नियंत्रकपदी प्रा.डॉ.दीपक शिंदे यांची निवड

## देशभरातील सुमारे ४० विद्यापीठात परीक्षेच्या कामात सक्रिय सहभाग

**नांदेड/प्रतिनिधी**



नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माध्यम शास्त्र संकुलाचे प्राध्यापक व माजी संचालक डॉ.दीपक मोहनराव शिंदे यांची केंद्रीय जनजाती विद्यापीठ विशाखापट्टणम (विजयानगरम) येथे परीक्षा नियंत्रक म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. नांदेड येथील महात्मा गांधी मिशन पत्रकारिता महाविद्यालयाची स्थापना डॉ दीपक शिंदे यांनी माजी मंत्री कमल किशोर कदम यांच्या मार्गदर्शना खाली केली. त्यानंतर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात पत्रकारिता विभागाचे संचालक म्हणून १४ वर्षे काम केले. या काळात विद्यापीठात अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक मीडिया स्टुडिओ उभा केला, मीडिया विभाग स्वतंत्र इमारतीत स्थलांतरित करण्यात डॉ शिंदे यांचा मोठा वाटा आहे, विद्यापीठातील श्री गुरुगोविंद सिंग अध्यासन संकुल सुरू करून या संकुलासाठी केंद्र शासनाकडून २५ कोटी रुपयांचा निधी मिळवून देण्यात डॉ शिंदे यांनी मोठे योगदान दिले आहे. दैनिक प्रजावाणी, दैनिक लोकपत्र, दै.नागपूर पत्रिका या दैनिकातून प्रारंभीच्या काळात त्यांनी काम केले आहे. नांदेड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल दर्पण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. डॉ. दीपक शिंदे हे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेतल्या जाणार्या नेट परीक्षेसाठी एनटीएकडून नेमले गेलेले देशाचे समन्वयक आहेत. सेट परीक्षेचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परीक्षेत्राचे समन्वयक म्हणून त्यांनी उत्तम काम केले आहे. विविध लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीच्या कार्यात पत्रकारिता विषयाच्या कामात ते प्रमुख सहभागी आहेत. एनएएसी बेंगलोर यांच्या वतीने पाठविण्यात येणार्या समितीचे अनेक ठिकाणी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. देशभरातील सुमारे ४० विद्यापीठात परीक्षेच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग आहे तसेच पंजाब, दिल्ली, हरियाणा, प.बंगाल राज्यातील व महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर सदस्य तर नांदेड व गडचिरोली विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. शिंदे यांनी काम केले आहे. त्यांच्या झालेल्या निवडीबद्दल आ प्रताप पाटील चिखलीकर, आ.हेमंत पाटील,आ राजेश पवार, आ.विक्रम काळे, आ. रामराव पवार पाटील, माजी मंत्री कमलकिशोर कदम, माजी मंत्री डी.पी. सावंत, कुलगुरू डॉ.मनोहर चासकर प्रा. कुलगुरु डॉ महाजन, माजी कुलगुरू डॉ दिलीप म्हैसेकर, डॉ सुधीर गव्हाणे,व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, कुलसचिव डॉ. डी.डी.पवार, संचालक बी.बी.सुरवसे, प्राचार्य डॉ वसंत भोसले, प्राचार्य गणेशचंद्र शिंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ.अशोक कदम यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# औद्योगिक क्षेत्रातील जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**बोईसर/प्रतिनिधी**

तारापूर औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक सांडपाण्यामुळे निर्माण होणारे वाढते जलप्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी महिनाभरात कठोर उपाय योजना आखण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. औद्योगिक सांडपाण्यामुळे समुद्रातील मासे मृत होण्याच्या घटनांची गंभीर दखल घेत यावर कायम उपाययोजना आखण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित अधिकारी, बाधित ग्रामपंचायती आणि मच्छीमार संघटना यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एमआयडीसीच्या भूमिगत गटारातून औद्योगिक सांडपाण्याची होणारी गळती आणि काही उद्योगांकडून टँकरद्वारे चोरीछुपे परिसरातील निर्जन ठिकाणी सांडपाण्याची लावली जाणारी विल्हेवाट यामुळे मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होऊन खाडी आणि समुद्रातील मासे मृत होण्याचे प्रकार घडत आहेत. जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी तारापूर मधील प्रदूषणाची गंभीर दखल घेत गुरुवारी सर्व संबंधित विभाग आणि बाधित गावांची जिल्हाधिकारी कार्यालयात संयुक्त बैठक घेतली. या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपविभागीय अधिकारी सुनील माळी, तहसीलदार रमेश शेंडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक, एमआयडीसीचे उपअभियंता अविनाश संखे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी राजू वसावे आणि वीरेंद्र सिंग, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) चंद्रशेखर जगताप यांच्यासह ग्रामपंचायतीचे सरपंच आणि मच्छीमार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी यांनी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक सांडपाण्यामुळे होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी कठोर उपाय योजना अमलात आणण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देऊन पुढील महिनाभरात त्याचे दृश्य परिणाम दिसले पाहिजेत अशी सक्त ताकीद दिली. एमआयडीसी विभागाने सांडपाणी वाहून नेणारी सर्व भूमिगत गटारे आणि वाहिन्यांची तपासणी करून तात्काळ दुरुस्ती करणे, पोलीस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवून टँकरद्वारे निर्जन ठिकाणी केल्या जाणाऱ्या रासायनिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाट लावणाऱ्या टोळ्यांवर कठोर कारवाई करणे, एमआयडीसी परिसरात पाण्याच्या टँकर वाहतुकीविरोधात जारी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल आणि वायू प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर देखरेख ठेवणे, संशयित किंवा तक्रार आलेल्या उद्योगाविरोधात तात्काळ पाहणी करून कारवाईबाबत अंमलबजावणी करणे, ५० दशलक्ष लिटर क्षमता असलेले सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे इत्यादी उपायोजना यावेळी सुचवण्यात येऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील काही उद्योगांकडून प्रक्रिया न करता रासायनिक सांडपाण्याची परस्पर विल्हेवाट लावली जात असल्यामुळे औद्योगिक क्षेत्र परिसरातील सरावली, खैरेपाडा, बेटेगाव, कोलवडे, कुंभवली, सालवड, पास्थळ, पाम, नवापूर, नांदगाव, आलेवाडी, मुरबे, कुंभवली या ग्रामपंचायत हद्दीमधील शेती आणि बागायती सोबतच कूपनलिका, विहिरी, तलाव सारखे पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होऊन पर्यावरणाचे नुकसान आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने केल्या जात आहेत. मात्र नागरिकांच्या तक्रारीनंतर देखील औद्योगिक सांडपाण्यामुळे निर्माण होणारे जलप्रदूषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि तारापूर औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून पुरेसा उपाययोजना होत नसल्यास आरोप केला जात आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमध्ये मुख्यत्वे करून मोठे, मध्यम, व लहान प्रकारचे रासायनिक, औषध निर्मिती, कीटकनाशक निर्मिती, व कापड यांवर प्रक्रीया करणारे तसेच अभियांत्रिकी,पोलाद आणि स्टील चे जवळपास १२०० कारखाने कार्यरत आहेत. औद्योगिक परीसरात सांडपाणी निर्माण करणारे लाल व नारंगी संवर्गातील एकूण ४४४ उद्योग आहेत. यापैकी १०३ उद्योगांनी शून्य निकसन यंत्रणा बसविली आहे. मोठ्या व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांनी त्यांच्या उत्पादन प्रक्रीयेत निर्माण होणार्या सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी प्रथम, द्वितीय, व काही उद्योगांनी तृतीय स्वरूपाची प्रक्रीया उभारलेली आहे. तसेच लघु उद्योगांनी त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रीया करण्याकरीता प्राथमिक स्वरूपाची सांडपाणी सयंत्रणा तयार केली आहे. तारापूर येथील सीईटीपी-टीईपीएस चालवीत असलेल्या ५० दशलक्ष लिटर क्षमतेच्या सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात सद्य स्थितीत फक्त २५ दशलक्ष लिटर औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यानंतर प्रक्रियाकृत सांडपाणी एमआयडीसीच्या भूमिगत वाहिनीद्वारे नवापूर



जवळील समुद्रात ७.१ किलोमीटर खोलपर्यंत सोडण्यात येते. मात्र तारापूर मधील उद्योगांमध्ये २५ दशलक्ष लिटर पेक्षा अधिक सांडपाणी निर्माण होत असल्याचा अंदाज असून जास्तीच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता नसल्यामुळे या सांडपाण्याची भूमिगत गटारांच्या चेंबर मधून गळती होण्याचे प्रकार घडत आहेत. सांडपाण्याची गळती रोखण्यासाठी ५० दशलक्ष लिटर क्षमतेचा सामुदायिक सांडपाणी प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे भविष्यात जास्त सांडपाणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सालवड येथील बंद असलेल्या जुन्या २५ दशलक्ष लिटर सामुदायिक सांडपाणी प्रकल्पाची दुरुस्ती करून तो देखील कार्यान्वित करण्याची गरज आहे. तारापूर औद्योगिक वसाहतीमुळे बोईसर परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. बोईसर आणि परिसरातील दहा ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात जवळपास दोन लाखांपेक्षा अधिक नागरिक राहत आहेत. लाखोंच्या संख्येने नागरिक राहत असलेल्या इमारती आणि झोपडपट्टी परिसरातून निघणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची कोणतीही यंत्रणा सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे उपलब्ध नाही. मोठ्या गृहसंकुलांनी उभारलेले सांडपाणी प्रकल्प अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असून मलमूत्रयुक्त सांडपाणी विना प्रक्रिया नैसर्गिक नाले, ओहोळ यांच्याद्वारे खाडीमध्ये सोडले जात आहे. त्यामुळे जल प्रदूषणास कारणीभूत औद्योगिक सांडपाण्यासोबत घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी देखील यंत्रणा उभारण्याची मागणी होत आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

28 APRIL TO 04 MAY 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 4/26/2025 8:19 PM Page 1



# निरंकारी भक्तांकडून देशभरात ३०००० युनिट रक्तदान



**वसई/प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे संत निरंकारी मिशन मार्फत २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ प्रेम व बंधुभावना जागविणारा 'मानव एकता दिवस', श्रद्धा व भक्तीभावपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे. मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशन कडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो जी नि:स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाशदेखील जनसामान्यांपर्यत पोहचविला जातो. हा दिवस या गोष्टीचा परिचायक आहे, की सेवा केवळ एक कार्य नसून निष्काम समर्पण व आत्मिक भावनेचे द्योतक आहे. देशभरात ३०,००० युनिट रक्तदानयावर्षी सुद्धा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन मार्फत पूर्ण भारतवर्षात सुमारे ५००हून अधिक शाखांमध्ये भव्य रक्तदान शिबिरांची अखंड श्रृंखला आयोजित करण्यात आली. संत निरंकारी हेल्थ सिटीच्या मेडिकल डायरेक्टर गीतिका दुग्गल यांनी माहिती देताना सांगितले, की आज सम्पूर्ण भारतभर आयोजित रक्तदान श्रृंखलेअंतर्गत सुमारे ३०,००० यूनिट रक्त संकलित करण्यात आले ज्यामध्ये केवळ दिल्ली येथील शिबिरात जवळपास १००० युनिट रक्त जमा करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेशात ४ शिबिरांमध्ये १२५८ युनिट रक्तदानमानव एकता दिवसाचे औचित्य साधून मुंबई महानगर प्रदेशात ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये एकंदर १२५८ युनिट रक्त संकलित केले गेले. त्यापैकी संत निरंकारी सत्संग भवन, चेंबूर येथे आयोजित रक्तदान शिबिरात २३० निरंकारी भक्तांनी रक्तदान केले ज्याचे संकलन संत निरंकारी रक्तपेढी, विले पार्ले मार्फत करण्यात आले. दूसरे शिबिर संत निरंकारी सत्संग भवन, ओसवाल नगरी, नालासोपारा येथे आयोजित करण्यात आले ज्यामध्ये ४६५ निरंकारी भक्तांनी रक्तदान केले. या शिबिरामध्ये नायर हॉस्पिटलने १७५ यूनिट, जे.जे.हॉस्पिटलने ने १२९ यूनिट तर जगजीवनराम हॉस्पिटलने १६१ युनिट रक्त संकलित केले. तिसरे शिबिर ग्राम सेवालय, उंबरपाडा, सफाले (पूर्व) येथे आयोजित केले होते ज्याठिकाणी के.ई.एम.हॉस्पिटलकडून २५९ युनिट रक्त संकलित केले गेले. चौथे शिबिर संत निरंकारी सत्संग भवन, मोठा गाव, डोंबिवली येथे आयोजित करण्यात आले ज्यामध्ये ३०४ निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. याठिकाणी जे.जे.महानगर रक्तपेढीने रक्त संकलन केले. हे महाअभियान केवळ रक्तदान नसून सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे जे आम्हाला शिकवते, की मानवता हाच सर्वोच्च धर्म होय. याच प्रेरणेने युक्त संत निरंकारी मिशन, सेवा आणि समर्पणाच्या पथावर निरंतर मानवतेचा मार्ग प्रशस्त करत आहे. बाबा गुरबचनसिंहजी यांचे लोकोत्तर कार्ययुगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्यबोधाच्या माध्यमातून समाजाला अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथांपासून मुक्त करुन नशामुक्ती, साधे विवाह आणि युवावर्गाला सकारात्मक विचारांशी जोडणे यांसारख्या लोककल्याणकारी अभियांनाची प्रेरक सुरवात केली. त्यांचे पावन मार्गदर्शन पुढे चालवत बाबा हरदेवसिंहजी यांनी रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको हा अमर संदेश देऊन रक्तदानाला मिशनच्या आध्यात्मिक सेवेचे अभिन्न अंग बनवले. हा संदेश आजदेखील प्रत्येक निरंकारी भक्ताच्या ह्रदयामध्ये सेवा व समर्पणाची प्रेरक ज्योत बनून तेवत आहे. हा दिवस चाचा प्रतापसिंहजी यांच्यासह त्या सर्व समर्पित बलिदानी संतांच्या पुण्य स्मृतिचे प्रतीक आहे, ज्यांनी मानव एकता, नि:स्वार्थ सेवा आणि आध्यात्मिक जागृतीच्या मार्गावर चालत असताना आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मानवएकता दिवस त्याच संतांचा दृढविश्वास व दृढसंकल्पाची प्रेरणा जीवंत करतो. मानव एकता दिवसाच्या निमित्ताने मुंबई महानगर प्रदेशामध्ये सुमारे ६० ठिकाणी विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले ज्या द्वारे बाबा गुरबचनसिंहजी व अन्य बलिदानी संतांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा प्राप्त करण्यात आली.

# दुचाकी चोरांच्या वालीव पोलिसांनी आवळल्या मुसक्या



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहरातून वाहन चोरीच्या घटना वाढू लागल्या होत्या. यामध्ये स्पोर्ट्स बाईक, स्कूटी अशा वाहनांचा यात मोठा समावेश होता. मात्र आता या चोरांच्या वालीव पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून ७ बाईक तसेच विविध वाहनांचे साहित्य पोलिसांनी हस्तगत केले आहेत. मुंबईच्या आलिशान मार्गावर चोरीच्या वाहनांची रेसिंग लावण्यासाठी चोरटे या वाहनांचा वापर करत होते. वसईच्या वालीव पोलीस ठाणे हद्दीत ८ मार्च २०२५ रोजी ९ मार्च २०२५ रोजी दरम्यान विनायक इंटरप्राइझेस कंपनी समोरील पार्किंग, रेंज ऑफीस, गिता उद्योग नगर, याठिकाणी अर्जदार यांची बजाज कंपनीची पल्सर मोटार सायकल उघड्यावरुन चोरी झाली होती. याबाबत अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला होता. मुंबईच्या आलिशान महामार्गावर चोरीच्या वाहनांची रेसिंग लावून वाहने चालवणाऱ्या चोरट्यांना वालीव पोलिसांनी मुंबईच्या मालवणी परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली आहे. साहिल उर्फ बप्पी शाहिद अली शेख (२०) आणि अरशान उर्फ अरशू जाकीर सौदागर (२२) असे या आरोपींची नावे आहेत. यांच्याकडून ७ बाईक तसेच विविध वाहनांचे साहित्य असा एकूण ८ लाख २१ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. उर्वरित दोन आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत, असे सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील यांनी बोलताना सांगितले. वरील कामगिरी परिमंडळ २ च्या पोलीस उप आयुक्त पौर्णीमा चौघुले-श्रींगी, तुळींज विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील, वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप घुगे, पो.नि. गोरखनाथ जैद (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण पथकातील स.पो.नि. सचिन सानप, पो.ह. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, विनायक राऊत, पो.ना. बाळु कुटे, पो.शि. सचिन लांडगे, केतन गोडसे, म.सु.ब. नागनाथ केंद्रे आणि पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ २ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. अमोल बर्डे यांनी यशस्वीरित्या कामगिरी पार पाडली आहे.

# नांदणी टोल नाक्याजवळ ३३ किलो गांजा जप्त



**सोलापूर** : मध्यप्रदेशातील भोपाळहून कर्नाटकात दोन प्रवासी बॅगेत गांजा घेऊन निघालेल्या दोघांना मंद्रूप पोलिसांनी नांदणीच्या टोलनाक्याजवळ पकडले. यामध्ये ८ लाख ३८ हजार रुपयांचा ३३ किलो गांजा व २२ लाख रुपयांचा आयशर टेम्पो असा एकूण ३० लाख ३८ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी अटक केलेल्या दोघा संशयित आरोपींना न्यायालयात हजर केले असता पाच दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. जगदीश नन्नुलाल मेहर (३९) व बादशहा लतीत खान (३७) अशी त्यांची नावे आहेत. सोलापूर विजयपूर महामार्गावर मंगळवारी पहाटे चार वाजता ही कारवाई करण्यात आली. मंद्रूप पोलीस ठाण्याचे श्रेणी पीएसआय चंद्रकांत कदम व त्यांचे सहकारी मंगळवारी रात्री सोलापूर विजयपूर महामार्गावर गस्त घालत होते तेव्हा आयशर टेम्पो एमपी ०४ सी ६२ टीसी ०४१२ टेम्पोतून गांजासारखा वास येत होता. सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांना माहिती दिली टेम्पोत दोघेजण झोपले होते टेम्पो तपासणी केली असता दोन प्रवासी बॅगेत गांजा होता. ३३ किलो ५४० ग्रॅम गांजा आढळून आला आहे.

# 'जागतिक वसुंधरा दिना'निमित्त जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखर यांनी राबवली शिरगाव समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम



**पालघर/प्रतिनिधी**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत आज सायंकाळी शिरगाव समुद्रकिनारी स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडेयांच्या प्रमुख उपस्थितीत समुद्रकिनाऱ्यावरील प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व जनजागृती करण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) इजाज शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) चंद्रशेखर जगताप, महिला व बालकल्याण अधिकारी प्रवीण भावसार, स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अतुल पारसकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, वित्त व लेखा अधिकारी धनराज पांडे, कृषी अधिकारी पिंजारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिरगाव ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या स्वच्छता यंत्राचा वापर करून समुद्रकिनाऱ्याची साफसफाई करण्यात आली. यानंतर उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः प्लास्टिक व कचऱ्याचे संकलन करत श्रमदान केले. जिल्हाधिकारी इंदूराणी जाखर यांनी शिरगाव येथील स्थानिक दुकानदारांशी संवाद साधून, समुद्रकिनारी प्लास्टिकमधील वस्तू विक्री न करण्याचे आवाहन केले. तसेच पर्यटकांनी प्लास्टिक कचरा समुद्रकिनारी न आणावा यासाठी सतत जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. संपूर्ण जिल्ह्यात प्लास्टिकबंदी प्रभावीपणे राबवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी यावेळी सांगितले की, जिल्ह्यातील ४७३ ग्रामपंचायतींमध्ये सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेंतर्गत संकलित प्लास्टिक कचरा स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत उभारण्यात आलेल्या तालुका स्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्पात पाठवावा. ज्या तालुक्यांमध्ये हे प्रकल्प नाहीत, त्यांनी स्थानिक प्लास्टिक पुनर्विक्रेत्यांकडे कचरा वर्ग करावा. असे निर्देश त्यांनी दिले. तालुका स्तरावर देखील आज स्वच्छता मोहीम राबवून कचरा गोळा करण्यात आला. शाश्वत स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि प्रशासन-जनतेचा एकत्रित सहभागातून हा कार्यक्रम संपन्न झाला.

# विवळवेढे सरपंचाचा भीषण अपघात



**डहाणू/प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील विवळवेढे (महालक्ष्मी) येथील जत्रा सुरू असतानाच येथील ग्रुप ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच नितेश भोईर यांचा भीषण अपघात झाला असून हा अपघात घडवून त्यांच्यावर हल्ला झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. बुधवार २३ एप्रिल रोजी पहाटे ४.१५ ते ४.३० वाजताच्या सुमारास सरपंच जत्रेतुन घरी जात असताना रस्त्यात निर्मनुष्य ठिकाणी त्यांच्यावर हल्ला झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सरपंच नितेश भोईर हे बुधवारी जत्रेमध्ये आपले काम आटोपून पहाटेच्या सुमारास घराकडे जात असताना त्यांचा अपघात झाला. यावेळी त्यांच्यावर हल्ला झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. यामध्ये त्यांच्या डोक्याला आणि हाताला गंभीर दुखापत झाली आहे. निर्मनुष्य ठिकाण असल्यामुळे अपघातानंतर त्यांना तत्काळ मदत मिळण्यास उशीर झाला असून स्थानिकांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती दिली. सध्या ते बेशुद्ध अवस्थेत गुजरात मधील वापी येथील रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सध्या विवळवेढे येथे महालक्ष्मी देवीची जत्रा सुरू आहे. जत्रेमध्ये लाखोंची गर्दी उसळत असून याचा फायदा घेत सरपंच यांच्यावर पूर्ववैमनस्यातून हल्ला झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी भेट दिल्यानंतर पोलिसांनी तपासातून घटनेचा उलगडा होणार असल्याची माहिती दिली.

# सव्वा लाखांचा बनावट विदेशी मद्यसाठा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील कोनगाव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भिवंडी विभागाने केलेल्या कारवाईत एका फ्लॅट वर छापा मारून तेथून १ लाख २८ हजार १३० रुपयांचा बनावट मद्यसाठा जप्त केला आहे. कोनगाव येथील शिवम कॉम्प्लेक्स या इमारती मधील एका फ्लॅट मध्ये संजोग दशरथ मुकादम हा व्यक्ती अवैद्यरित्या भेसळयुक्त बनावट विदेशी मद्याचा साठा बाळगुन त्यांची विक्री करत असल्याची गुप्त बातमी मिळाल्या नुसार सदर ठिकाणी उत्पादन शुल्क अधिकारी एस.एस. खंडेराय यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेल्या कारवाईत बनावट विदेशी मध्य भरलेले ११ बॉक्स बॉटल्स तसेच रिकाम्या बाटल्या व प्लास्टिक बूच असा १ लाख २८ हजार १३० रुपयांचा बनावट मद्य साठा जप्त केला आहे. या कारवाईची कुणकुण लागताच आरोपी संजोग दशरथ मुकादम हा फरार झाला. उत्पादनशुल्क विभागाने सर्व मुद्देमाल जप्त करीत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# 'यंग स्टार ट्रस्ट'तर्फे चांगभलं चषक एकपात्री स्पर्धेत अक्षता साळवी विजेती तर प्रदीप कबरे यांना जीवन गौरव




**विरार/प्रतिनिधी**

नालासोपारा मधील लेखक, नाट्यकलाकार आणि कवी रमाकांत वाघचौडे यांच्या स्मृती प्रीतीर्थ माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या यंग स्टार ट्रस्ट तर्फे नालासोपारा येथे कै. रमाकांत शंकर वाघचौडे (बापू) स्मृतिचषक चांगभलं चषक २०२५ स्पर्ध्येचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्ध्येत अक्षता साळवी हि विजेती ठरली तर यंदाचा चांगभलं जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ सिने आणि नाट्यकर्मी प्रदीप कबरे यांना देण्यात आले. या स्पर्ध्येचे उदघाटन माजी उपमहापौर उमेश नाईक, माजी स्थायीसमिती सभापती तथा स्पर्ध्येचे समन्वयक अजीव पाटील आणि उषा वाघचौडे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्ध्येत ५५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून रामदास कामत आणि मिताली वाईरकर यांनी काम पाहिले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ रोहित ठाकूर, प्रदीप कबरे आणि दोन्ही परीक्षकांचा हस्ते करण्यात आले. यावेळी प्रदीप कबरे याना रोहित ठाकूर यांच्या हस्ते जीवन गौरव पूर्वसंस्कार देण्यात आला. तसेच संदेश नायक, रामनाथ कथोरे व पत्रकार प्रसाद जोशी यांनाही चांगभलं पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्ध्येत विजेत्याला १०,००१ (स्मृतिचिल+प्रमाणपत्र), तर द्वितीय ७००१ (स्मृतिचिन्ह+प्रमाणपत्र), तृतीय ५००१ (स्मृतिचिन्ह +प्रमाणपत्र), देण्यात आली. हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रविशंकर पिल्ले, परेश किणी, शांताराम वाळींजकर, सीमा पाटील, केदार जोशी आणि नवीन वाघचौडे यांनी मेहनत घेतली होती. दरम्यान स्पर्ध्येतील विजेते प्रदीप कबरे याना जीवन गौरव, अक्षता साळवी प्रथम, विल्सन खराडे द्वितीय, परेश मोरे तृतीय, तृप्ती चौरसिया, प्रेरणा खेडेकर व शंकर सावन्त याना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

# माझी वसुंधरा सप्ताहास महापालिकेत सुरुवात




**विरार/प्रतिनिधी**

वसई -विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वसुंधरा दिनाचे औचित्य साधून आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली २२ एप्रिल ते ३० एप्रिल कालावधीत वसुंधरा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. पृथ्वीचे संरक्षण करणे हि प्रत्येकाची जबाबदारी असून या जबाबदारीचे स्मरण करून देणे हे वसुंधरा सप्ताहाचे मूळ उद्दिष्ट आहे. या सप्ताहाची सुरुवात २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिना निमित्त प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील चक्रेश्वर तलाव, नालासोपारा (प.) या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून करण्यात आली. प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील 'पापडी तलाव' तसेच प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील शूर्पारक बौद्ध स्तूपा जवळील तलाव (बावखळ) व प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील करमाळे तलाव (बावखळ) तसेच वसई- विरार भागातील वैशिष्ट असलेल्या बावखळीची स्वच्छता करण्यात आली. तसेच स्वच्छतेची महती सांगणारे विविध पथनाट्य सादर करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता दुतांचा सत्कार करण्यात आला. तसेच वसई विधानसभा आमदार स्नेहा दुबे-पंडीत आणि नालासोपारा विधानसभा आमदार राजन नाईक यांनी पालिकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. तसेच आयुक्त यांनी स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे. यावेळी महानगर पालिकेमार्फत विविध शहराच्या विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार असल्याची माहिती दिली. या स्वच्छता मोहिमेत आमदार राजन नाईक, आमदार स्नेहा दुबे पंडीत, आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपआयुक्त अजित मुठे, सहा.आयुक्त अश्विनी मोरे, सहा. आयुक्त अलका खैरे तसेच पालिकेचे अधिकारी व कर्मचारी, विविध राजकीय पक्षांचे व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यांनी सहभाग घेवून तलाव व परिसर स्वच्छ करून माझी वसुंधराची शपथ घेतली.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत शिल्पा कोरे हिचे यश

**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी)वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत शिल्पा शिवाजीराव कोरे हिने उत्तुंग यश मिळविले आहे. राज्य सरकारचा कारभार जिथून चालतो त्या मंत्रालयात तिची सामान्य प्रशासन विभागात सहाय्यक पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल तिचे वडील शिवाजीराव कोरे, आई काशीबाई कोरे, अनुसया काळे, राजु कोरे, अशोकराव काळे, योगेश हरडगे, दत्ता भंडारे, मनोज चव्हाण, हेमंत मोरे, विनोद धायगुडे, आयुष काळे, कल्पना काळे, अलका मुळे, आचल काळे, रमेश धुमाळ यांच्यासह कोरे व काळे परिवारातील आणि अष्टविनायक मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पहलगाम येथे अतिरेकी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना वाड्यात श्रद्धांजली!

वाडा : जम्मू काश्मीरच्या पहलगाम मधील बैसरन भागात मंगळवारी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला करून मुस्लिम दहशतवाद्यांनी पर्यटकांवर बेछूट गोळीबार केला या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याला जबाबदार असणाऱ्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. पहलगाम येथील दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या हिंदू बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व अशा प्रकारच्या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी सकल हिंदू समाज वाडा तर्फे बुधवारी हनुमान मंदिर ते खंडेश्वरी नाका पर्यत निषेध मोर्चाचे आयोजन केले होते. या मोर्चात वाड्यातील व्यापारी, नागरिक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. खंडेश्वरी नाका येथे आल्या नंतर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले यावेळी आमदार शांताराम मोरे यांच्यासह इतरांनी मृतकांना श्रद्धांजली अर्पण करून या भ्याड हल्लाचा निषेध व्यक्त केला.



28 APRIL TO 04 MAY 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 4/26/2025 8:20 PM Page 1



पान १ वरून....

## खुनी पतीच्या पापाचा भरला ...

आल्याची माहिती मंगळवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे यांना माहिती मिळाली होती. त्यानुसार घटनास्थळी धाव घेवून रणवरे यांनी माहिती घेतली असता, सदर महिला भंगार गोळा करण्यासाठी या ठिकाणी नेहमी येत असल्याची आणि ती फुलपाडा परिसरात राहत असल्याबाबतची माहिती मिळाली. तिच्या राहत्या ठिकाणी गेल्यावर सखू भोईर (५०) असे तिचे नाव असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तिचे पती शांताराम भोईर, मुलगा अंकुश, मुलगी पुजा आणि सुन दिपाली यांच्याकडे याप्रकरणी चौकशी केली असता, या सर्वांच्या जबाबात तफावत दिसून आली. त्यानुसार गुन्हे शाखेने पती शांतारामची उलट तपासणी केली असता त्याने खूनाची कबुली दिली. सखूचे शिवा सहाणी याच्याशी अनैतिक संबध असल्याने त्यांच्यात नेहमी भांडणे व्हायची. घटनेच्या दिवशी सखू घरी न परतल्याने तिचा शोध घेत नरेश पाटील यांच्या वाडीत गेलो असता सखू त्या ठिकाणी झोपल्याचे दिसून आले. त्यामुळे तिला घरी परतण्याचा आग्रह केला असता तिने नकार दिल्याने त्यांच्यात भांडण झाले. त्यातून सखूच्या डोक्यात दगड घालून तिचा खुन केल्याचे शांतारामने कबुल केले. त्यानुसार सखूची मुलगी पुजाने दिलेल्या तक्रारी वरुन विरार पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खून झालेल्या अनोळखी महिलेची ओळख पटवून तिच्या खुन्याला अटक करण्याची कामगिरी गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पथकाने केली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि सुहास कांबळे, हवालदार मुकेश तटकरे, रमेश आलदर, सागर बारवकर, प्रशांत पाटील, अमोल कोरे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, राकेश पवार, आतिश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, सागर सोनवणे, प्रविण वानखेडे यांनी केली आहे.

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट झाला...

प्रियकर बनलेल्या मित्राला समजावले, पण दोघेही ऐकत नव्हते. अखेर राघूने आपल्या पत्नीच्या प्रियकराचा काटा काढण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या मित्राच्या मदतीने सौरभची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. इस्लामपुर मधील माळगल्ली येथे सौरभ राजेद्र केर्लेकर हा आपल्या कुटुंबियासमवेत राहयला आहे. तो डीजे ऑपरेटरचे काम करीत असल्याने इस्लामपुर मधील अनेकांशी त्याची मैत्री आहे. या मैत्रीतूनच तो शिवनगर येथील त्याचा मित्र अरविंद उर्फ राघु सुभाष साठम यांच्या घरी येत जात होता. योगायोगाने राघु याची पत्नी ही सौरभ याच्या नात्यातील होती. सौरभ आणि राघु याचेत मैत्री असल्याने सौरभ याचे राघु याच्या घरी नेहमी येणे जाणे असायचे.राघु याची पत्नी नयना (काल्पनिक नांव) ही त्याला आवडत असल्याने तो राघु याच्या माघारी त्याच्या येत जात होता. नयना ही सौरभ याच्या नात्यातील असल्याने सुरवातीला राघु याला त्याचे येणे जाणे खटकत नव्हते. परंतु तो तिच्याशी लाडी गोडी करीत जवळीक साधत असल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर मात्र तो सौरभ आणि नयनावर संशय घेऊ लागला. खरे तर राघु याच्या लग्नाच्या अगोदर पासूनच सौरभ याचे नयनाबरोबर प्रेमसंबंध होते. नयनाच्या आई वडिलांनी नयनाचे लग्न राघु याच्याबरोबर लावून दिले तरी सौरभ आणि नयना याचे प्रेमप्रकरण थांबले नव्हते. आता त्याचे ते संबंध विवाहबाहय संबंधामध्ये बदलले होते. नयना ही सौरभ याच्याशी आपल्या मोबाईलवरून तास न तास बोलत असायची दोघे ही सोशल मिडियावर कायम ॲक्टिव्ह राहत होते. दोघे ही चॅटिंग करीत असल्याचे राघु याच्या लक्षात आलेले होते. राघु हा वाघवाडी फाटयावर असणाऱ्या एका हॉटेलात कामाला होता. तो कामावरून रात्री उशिरा घरी परतत होता. त्यामुळे नयनाला सौरभबरोबर बोलण्यासाठी वेळ मिळत होता. ते दोघे ही नातलग असल्याने एकदा सौरभने नयनाला बाहेर भेटायला बोलविले. त्यावेळी ती आली. ते दोघे ही एका लॉजवर गेले. तेथे त्यांनी एक रुम बुक करून दोघांनी ही मनसोक्तपणे शरीरसुख घेतले. तिला ही नवरा राघु याच्यापेक्षा सौरभकडून घेतलेले शरीरसुख भारी वाटले.त यामुळे ती आता नवऱ्यापेक्षा सौरभकडून शरीरसुख मिळवू लागली. दोघे ही संधी मिळताच वासनेच्या डोहात बुडत होते. तो ही कुठे कमी पडत नव्हता. तिची हरएक गरज तो पुर्ण करू लागल्याने ती त्याला साथ देवू लागली.तिला आता याकामी नवरा नकोच वाटत होता. त्यामुळे ती बिनधास्तपणे सौरभबरोबर हिंडत होती, फिरत होती. याचा राग राघु याला येत होता.हल्ली तो कामावरून घरी परत येताना दारू पिऊनच येवू लागला. दारूच्या नशेत तो नयनाला मारहाण करीत सौरभचा नाद सोड, घराकडे संसाराकडे लक्ष दे असे सांगत होता. तिला मात्र सौरभ आवडत असल्याने ती त्याला सोडायला तयार नव्हती. सौरभ आणि नयनाच्या संबंधाची चर्चा ही गावात आणि पै-पाहुण्यात होत होती. त्यामुळे राघु याची अब्रू वेशीला टांगली जात होती. नयनाच्या बाहेरख्याली वागण्याने तो त्रस्त झाला होता. त्याने याची कल्पना आपल्या सासु सासऱ्यांना देवन नयनाला ताकीद देण्यास सांगितले होते. परंतु त्यांनी नयनाला ताकीद देण्याऐवजी तिच्या कृत्यावर पांघरून घालून उलट राघु यालाच दारू पिण्यावरून खडसावले होते. त्यामुळे तो जास्तच नयनावर चिडला होता.ती काही सौरभचा नाद सोडयला तयार नव्हती. त्यामुळे तो वैतागलेला होता. त्यातच मागे एकदा नयना आणि सौरभ हे त्याच्या घरी त्याला नको त्या अवस्थेत रंगेहात सापडले होते. सौरभ आपल्या पत्नीचा शारीरिक उपभोग घेत आहे आणि आपण नुसते बघत राहत आहोत याचा राग त्याला येत होता. ज्यावेळी ते दोघे त्याला रंगेहात सापडले होते त्यावेळी तो सौरभला मारण्यास गेला होता.परंतु नयनाने त्याला त्याच्या तावडीतून सोडविले होते. आता या सौरभचे काय करायचे याचा तो विचार करीत होता. तो ज्या वाघवाडी येथील हॉटेलात काम करीत होता. तेथे त्याची मैत्री किरण सातपुते याच्याशी झाली होती. किरण ही त्याच हॉटेलात काम करीत होता. राघु याने किरणला आपली बायको सौरभ केर्लेकर याच्या नादाला लागली आहे. त्यामुळे आपण बेजार झालेलो आहे असे सांगून सौरभ याचा कायमचा काटा काढण्यासाठी त्याचेकडे मदत मागितली. किरण याच्या कानावर देखील या अगोरद राघु याच्या बायकोचे प्रेमप्रकरण आलेले होते. त्यामुळे तो राघु याला मदत करायला तयार झाला. सौरभ हा डीजे ऑपरेटर असल्याने किरण याच्याशी ही त्याची ओळख होती. किरण आणि राघु यांनी सौरभ याची गेम करण्याचा प्लॅन केला. त्या प्लॅननुसार त्यांनी मंगळवार दि.२२ एप्रिल रोजी रात्री सौरभ याला वाघवाडी फाटयावर दारू पिण्यासाठी बोलावून घेतले. त्या रात्री सौरभ हा डीजे वाजविण्यासाठी बाहेर गेला असल्याने त्याला यायला थोडा उशिराच झाला. तो रात्री १ वाजण्याच्या सुमारास वाघवाडी फाटयावर आपल्या बाईकने राघु याच्या हॉटेलात गेला.त्याची वाट पाहत राघु आणि किरण बसले होते. तो आल्यावर त्यांनी दारू प्यायला बसले. सौरभला त्यांनी जास्तच दारू पाजली. तो दारूच्या नशेत असताना नयनाचा विषय काढून सौरभ याला तिचा नाद सोडून दे नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील असे सांगितले. या कारणातून त्याची भांडणे सुरू झाली.भांडता भांडता ते तिघे ही हॉटेलाच्या बाहेर आले. ते तिघे ही फुल्ल दारूच्या नशेत असल्याने एकमेकाला शिवी गाळ करीत होते. सौरभ हा नयनावरून राघू याला बोलला. तुझ्या लग्नाअगोरद पासून तिचे माझे संबंध आहेत. उलट तु आमच्या दोघांच्या संबंधाच्या आड येत आहेस. ती माझी आहे.आणि मी तिचा आहे. तिच्यावर माझा हक्क आहे. आपल्या पत्नीवर सौरभ हा हक्क सांगत असल्याचे बघून राघु याला त्याचा राग आला.रागाच्या भरात त्याने किरणला खुणविले. तसे सौरभला त्या दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरूवात केली. तो आपली बाईक घेऊन पळून जात असताना त्या दोघांनी त्याचा पाठलाग त्याला वाघवाडी फाटवयावरील रस्त्यात परत आडविले. त्यावेळी बेसबॉलच्या स्टिकने किरण आणि राघु यांनी सौरभच्या चेहऱ्यावर, हातावर, पोटावर, छातीवर मारहाण केली. ही मारहाण इतकी जबर होती की, त्यांनी केलेल्या मारहाणीत सौरभ हा काळा निळा पडला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. त्याची बाईक तशीच रस्त्यात पडली होती. त्याला मारहाण करून राघु हा आपल्या घरी निघून गेला आणि किरण हा हॉटेलात झोपायला गेला. पहाटे पहाटे व्यायामला फिरायला येणाऱ्या लोकांना वाघवाडी फाटयाजवळील एका हॉटेलाच्या समोर असणाऱ्या रस्त्यावर एक तरूण मृतावस्थेत पडला असल्याची आणि त्याच्या शेजारी एक दुचाकी पडली असल्याचे दिसून आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती इस्लामपुर पोलीसांना देण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच इस्लामपुर पोलीस ठाण्याचे पो.निरी.संजय हारुगडे, स.पा.नी ज्योती सुर्यवंशी, हवा.दिपक ठोंबरे, शशिकांत शिंदे अमोल सावंत आदीच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळावरील पडलेल्या दुचाकी गाडीच्या नंबरवरून आणि मयत तरूणाच्या खिशातील कागदपत्रावरून मयत तरूण हा माळगल्ली येथील सौरभ राजेंद्र केर्लेकर हा असल्याची ओळख पटली. पोलिसांनी या घटनेची माहिती सौरभ याच्या घरच्या लोकांना दिली. ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही मयत तरूण हा सौरभ केर्लेकर हा असल्याचे पोलिसांना सांगितले. घटनास्थळी पोलीसांनी लाकडी बेसबॉलची स्टिक पडलेली दिसली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मयताचा पंचनामा करून पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी इस्लामपुर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत सौरभ याच्या नातेवाईकाकडून घेतली असता त्यांनी सौरभ याचे राघु साठम याच्या पत्नीशी विवाहबाहय संबंध असल्याची माहिती देऊन यातूनच त्याचा खुन राघु साठम याने केली असण्याची शक्यात व्यक्त केली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळा जवळील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता त्या फुटेजमध्ये सौरभ याला राघु साठम आणि त्याचा मित्र बेसबॉलच्या स्टिकने मारहाण करीत असल्याचे दिसत होते. या फुटेजवरून पोलिसांनी राघु साठम हा काम करीत असलेल्या हॉटेलात जावून चौकशी केली असता त्या हॉटेलच्या कॅमेऱ्यात ही सौरभ, राघु किरण हे तिघेजण दारू पित असताना दिसत होते. पोलीसांनी त्या हॉटेलात काम करणाऱ्या किरण सातपुते याला ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने पोलीसाकडे आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी अरविंद उर्फ राघु साठम याला ही ताब्यात घेतले. त्याने ही सौरभ याचे आपल्या पत्नीशी विवाहबाहय संबंध असल्याने आपण केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यु झाल्याचे पोलीसांना सांगितले. या दोघांनी आपला गुन्हा कबुल केले. या घटनेची लेखी फिर्याद मयत सौरभ केर्लेकर याच्या वडिलांनी इस्लामपुर पोलीस ठाण्यात दिल्याने पोलिसांनी त्याच्या फिर्यादीवरून सौरभ राजेंद्र केर्लेकर (वय ३०) रा.माळ गल्ली इस्लामपुर याच्या खून प्रकरणी राघु उर्फ अरविंद सुभाष साठम (वय ३२) रा.शिवनगर इस्लामपुर,आणि किरण रामचंद्र सातपुते (वय ३५) रा.रेड ता.वाळवा. सध्या रा.संभुआप्पा मठाजवळ इस्लामपुर या दोघा विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून या दोघांना इस्लामपुर पोलिसांनी गुरूवार दि.२४ एप्रिल २०२५ रोजी इस्लामपुर येथील कोर्टात हजर केले. मा.कोर्टाने या दोघांना ही तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली दुचाकी आणि लाकडी बेसर्बालची स्टिक जप्त केली. या घटनेचा पुढील तपास इस्लामपुर पोलीस ठाण्याचे पो.निरी. संजय हारुगडे याच्या मार्गदर्शनाखाली इस्लामपुर पोलीस करीत आहेत.

## मुलीवर केला बलात्कार भयंकर गुन्हा...

धमकावून वेळोवेळी बलात्कार करत होता. या संबंधातून ती गर्भवती राहिली होती. अखेर कंटाळून मुलीने हा प्रकार आपल्या आईला सांगितला. आईने पतीला जाब विचारला. त्यावरून त्यांच्यात भांडण झाली होती. २० मे २००४ रोजी साजिद शेखने मारहाण करून पत्नीची हत्या केली आणि फरार झाला. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात हत्या तसेच बलात्काराचा गुन्हा दाखल झाला होता. विरार पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला मात्र त्यांचा हाती काही लागले नाही. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी या गुन्ह्याचा नव्याने तपास करण्याचे आदेश गुन्हे शाखा २ च्या पथकाला दिले होते. मात्र त्यांच्याकडे २१ वर्षापूर्वीचा आरोपी शेख याचा फोटो होता. केवळ त्या फोटोवरून त्याचा माग काढण्याचे आव्हान पोलिसांपुढे पुढे होते. साजिद शेख हा ट्रक चालक असल्यामुळे पोलिसांनी त्याची माहिती काढली. तो हैदराबाद आणि गुजरात येथे काही वर्ष वास्तव्यास होता. तेथे देखील पोलिसांनी जाऊन माहिती काढली. तो मुंबईच्या धारावी येथे राहत असल्याची माहिती मिळाली. धारावी हा परिसर प्रचंड मोठा आणि झोपडपट्टीचा आहे. तेथून आरोपीला शोधून काढण्याचे आव्हान पोलिसांपुढे होते. पोलिसांनी धारावी परिसरात जाऊन माहिती काढण्यास सुरुवात केली त्यावेळी आरोपी शेख याच्यासारखा दिसणारा एक इसम परवेज उर्फ इडली या नावाने वावरत असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांचे एक पथक निवडणूक सर्वेक्षण करणारे कर्मचारी बनले आणि परवेज उर्फ इडली याच्या घरात जाऊन माहिती काढली. त्यावेळी परवेज उर्फ इडली वाला हाच साजिद शेख असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. सध्या तो ५५ वर्षांचा असून धारावी मध्ये टेम्पो चालक म्हणून काम करतो. गुन्हा केल्यानंतर आरोपी आपली ओळख लपवून वावरत होता. त्यामुळे त्याला पकडण्याचे मोठे आव्हान आमच्यापुढे होते. अखेर कसोशीने तपास करून आम्ही त्याला अटक केली अशी माहिती गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी दिली. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) सहाय्यक पोलीस आयुक्त मिलिंद बल्लाळ (गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ च्या पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर अहीरराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, सागर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अजित गीते, सहाय्यक फौजदार रमेश भोसले, संजय नवले, पोलीस हवालदार रवींद्र पवार, मुकेश पवार, सचिन पाटील, प्रुफल्ल पाटील, चंदन मोरे, राजाराम काळे, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरळे, प्रशांतकुमार ठाकूर, पोलीस अंमलदार, अकील सुतार, राहुल कर्पे, अनिल सावळे, अजित मैड, प्रतीक गोडके, राजकुमार गायकवाड आदींच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण करून या आरोपीला अटक केली.

पान ८ वरून....

## आईच्या अतिक्रमणामुळे मुलाने गमावले...

अतिक्रमण करण्यात आले असून, अतिक्रमणधारकांचे कुटुंबीय ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद सदस्यपदीही निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, अतिक्रमणे नियमित करण्यासाठी अनेकांनी तहसीलदार, प्रांत व जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केले आहेत. संबंधित विभागाने लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविणे गरजेचे असतानाही, त्याबाबत निर्णय घेण्यास टाळाटाळ होत असल्याची तक्रार आहे.

## सर्वसामान्यांच्या सर्वांगीण विकासासाठी...

मुंडे साहेब यांना रेणापूर भागाने मोठे केले तळहातावरील फोडाप्रमाणे सांभाळले त्या रेणापूर तालुक्यातील जनतेची सेवा करण्याचे मला भाग्य लाभले असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या २० वर्षापासून या मतदारसंघात काम करीत आहे पराभूत झालो म्हणून कधीच खचलो नाही जनतेला न्याय देण्यासाठी सतत संघर्ष करीत राहिलो. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचा विजयाची खात्री असल्याने मतदार संघ विकत घेण्याचे पाप काँग्रेसवाल्यांनी केले. मात्र जनता जनार्दन मतदारांनी ठरवल्यास भल्या भल्याची पाट लागल्याशिवाय राहत नाही हे लातूर ग्रामीणच्या मतदारांनी दाखवून दिले आहे असे बोलून दाखवले. गावागावातील एकोपा आपुलकी प्रेम भावना वाढली पाहिजे सांप्रदाय टिकला पाहिजे या भावनेतून टाळ मृदंग दिले या काँग्रेसवाल्यांनी चेष्टा केली. गोरगरीब सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा मान सन्मान वाढविणे ही निवडणूक मी नव्हे तर कार्यकर्त्यांनीच लढवली आणि जिद्दीने जिंकूनही दाखवली. मनाने श्रीमंत असलेल्या माझ्या कार्यकर्त्यांना काँग्रेसवाले विकत घेऊ शकले नाहीत असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, साखर कारखाने देशमुखांची जहागीरदारी नाही तर शेतकरी सभासदाच्या मालकीचे आहेत मांजराच्या दारात आंदोलन केल्यानेच एफआरपी द्यावी लागली. या कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्याचे हितच साधले पाहिजे जर आडवणूक होणार असेल तर त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावीच लागेल. हजारो लाखो जनतेचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असल्याने मला काहीही होणार नाही काँग्रेसवाल्यांनी आजाराबाबत काहीही बोलले तरी त्याकडे दुर्लक्ष करा असे सांगून आयुष्यभर सर्व मतदार बंधू भगिनींच्या ऋणात राहणार असल्याचे बोलून दाखवले. विधानसभा निवडणुकीत एकाच घरात सत्ता राबवणारे काँग्रेसचे देशमुख एका बाजूला आणि सर्वांना सोबत घेऊन काम करणारे रमेशआप्पा दुसऱ्या बाजूला या परिस्थितीत काँग्रेसची शक्तीपोटी कामाला आली नाही तर आप्पांचे टाळ मृदंग कामाला आले असल्याचे सांगून ॲड. बळवंतराव जाधव यांनी स्वतःला सहकार महर्षी समजणाऱ्यानी मोजक्या मताची निवडणूक लढवण्याऐवजी जिल्हा परिषदेच्या कुठल्याही मतदारसंघातून माझ्याविरुद्ध निवडणूक लढवावी असे जाहीर आवाहन दिले. मुंडे साहेबांनंतर रमेश आप्पाच्या रूपाने रेणापूर भागाला भाजपाचा आमदार लाभला सत्ता असो अथवा नसो आप्पा कधीच झोपले नाहीत मोडले नाहीत कष्टाने ताकतीने आमदार झाले काँग्रेसच्या आमदाराचा सांगून पराभव केला, वर्षानुवर्ष खडकाला धडका घेऊन पाणीच काढले असे सांगून ऋषिकेशदादा कराड यांनी रमेशआप्पांच्या विजयाचे खरे शिल्पकार कार्यकर्तेच आहेत या विषयात माय माऊलींचा मोठा वाटा असून मतदार बंधू-भगिनींनी रमेशआप्पावर दाखवलेल्या विश्वासाचा उपकार मी माझ्या कातडीचे जोडे करून मतदाराच्या पायात घातले तरी हे उपकार फिटणार नाही असे बोलून दाखवले. प्रारंभी महेंद्र गोरभरले यांनी सभेचे प्रास्ताविक केले नवनाथ भोसले आणि अभिषेक अकनगिरे यांनी आपले मनोगत व्यक्त करून गोरगरीब सर्वसामान्यांचे रमेशआप्पा नेते आहेत असे बोलून दाखवले. सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी प्रदीप कुलकर्णी, भाऊसाहेब गुळबिले, संपत कराड, मीनाताई मोटाडे, प्रेमला वाघमारे, ललिता कांबळे, शिला आचार्य, मनीषा मुंडे, अंबादास राठोड, सूर्यकांत मोटेगावकर, गोपाळ शेंडगे, अनिल येलगट्टे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, गेटूआप्पा हलकुडे, विजय चव्हाण, बसवराज गुरफळे, महेश गाडे, उज्वल कांबळे, अंगद कातळे, वैजनाथ लहाने, मारुती गालफाडे, रमाकांत फुलारी, दिलीप आकगिरे, सुनील बुड्डे, शिवाजी जाधव, मुस्तफा तसेवाले, दगडू गिरी, उद्धव सूर्यवंशी, प्रभाकर चव्हाण, पांडुरंग यशवंत, महादेव उगिले, रामचंद्र शिंदे, सचिन आगळे, दत्ता भंडारे, संजय डोंगरे, विलास नागरगोजे, पांडुरंग कलूरे, गोविंद नरहरे, आकाश चव्हाण, बालाजी बरुरे, दिलीप बरुरे, सुरेश बुड्डे, अजय आरदवाड, गंगाधर साळुंके, बाबुराव कस्तुरे, बालाजी केंद्रे, दत्ता मुंडे यांच्यासह रेणापूर, पानगाव, खरोळा आणि परिसरातील भाजपा व महायुतीच्या कार्यकर्त्यांसह मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अतिरेकी हल्ल्याचा वसईत भाजपाकडून...

यांनी मानवतेच्या बाजूने आणि दहशतीविरुद्ध एक आवाज उठवू या असे आवाहन नागरिकांना केले आहे. सुरक्षा यंत्रणांनी पहलगाव हल्ल्यानंतर तपास सुरू केला असून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. भाजपचे हे आंदोलन त्याच भावनेचे प्रतिबिंब असल्याचे दिसून आले. यावेळी जिल्महाध्यक्ष महेंद्र पाटील, शेखर धुरी, महेश सरवणकर, प्रज्ञा कुलकर्णी, अभय कक्कड, सिध्देश तावडे, देवेंद्र जेना, जोगेंद्र प्रसाद, प्रसाद चौधरी, बाळा सावंत, मनोज शर्मा, रामानुम सिंग, विनोद सकसेना आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'युपीएससी' परीक्षेतील संपदा वांगे...

शिक्षण रेणापूर तालुक्यात तर माध्यमिक शिक्षण लातुरात झालेले आहे. त्याच बरोबर महाविद्यालयीन शिक्षण लातूर व पुणे येथे पार पडले आहे. युपीएससी सारख्या परीक्षेला सामोरे जाताना तिला अनेक अडचणीही आल्या. मात्र तिने त्या अडचणीवर मात करत हे यश गाठले आहे. त्याचबरोबर तिला घरच्यांचाही तितकाच पाठींबा मिळाल्याने हे सहज शक्य झाले असल्याचे संपदाने सांगितले. विशेषत: आई निर्मला वांगे हिने सातत्याने यासाठी आपल्याला प्रोत्साहीत केले असल्याचे संपदाने सांगितले. विक्रम गोजमगुंडे यांनी ओबीसी समाज शिक्षणाच्या प्रवाहात यावा यासाठी विक्रम गोजमगुंडे यांनी केलेले कार्य अतुलनिय असून गोजमगुंडे परिवारानेही नेहमीच चांगल्या कामासाठी पाठबळ दिले असल्याची भावना वांगे परिवारानी यावेळी व्यक्त केली. संपदा मिळालेले यश तमाम जिल्हावासियांसह ओबीसी समाजासाठी अभिमानास्पद असल्याचे सांगून तिच्या या यशामुळे ओबीसी समाजातील हुशार आणि होतकरू विंद्यार्थ्यांना प्रेरणादायी असेल, असे विक्रम गोजमगुंडे यांनी यावेळी सांगितले. संपदा लवकरच आयएएस होवून ती जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत व्हावी अशी शुभेच्छा देवून तिच्या माध्यमातून चांगले कार्य घडावे असेही गोजमगुंडे म्हणाले. यावेळी चेतन कोले, सुरेश भंडारे यांच्यासह वांगे कुटूंबिय व समाज बांधव उपस्थित होते.

## वज्रेश्वरी देवस्थान परिसरात...

दिसून येत नाही. त्याचप्रमाणे या विषयावर मंदिराच्या विश्वस्तांचे लक्ष नाही असे दिसून येते. त्याचबरोबर वज्रेश्वरी ग्रामपंचायतीचे याठिकाणी लक्ष घातलेले दिसत नाही. कारण रस्त्याच्या कडेला दुकानांच्या रांगा लावलेल्या असतात. त्यामुळे भाविकांना, वृद्ध महिलांना किंवा मुलांना रस्त्याने चालणेही अवघड झाले आहे. तसं पाहायला गेले तर गणेशपुरी पोलीस स्टेशनची ही जबाबदारी आहे. परंतु पोलिसांनीही या विषयाकडे दुर्लक्ष केलं आहे. दर्शनाला गेलेल्या भाविकांकडून कार पार्किंगच्या नावाखाली बेकायदेशीरपणे आर्थिक लूट केली जाते. परंतु यातील प्रमुख भाग म्हणजे रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या गाडीवरती तीन-तीन लोक पार्किंग चार्ज मागतात व आपसात त्यांच्यातच भांडण करतात. त्यामुळे नेमकं कोण पार्किंग चालवत हेच समजत नाही. त्या पार्किंग चालकाकडे कोणताही ग्रामपंचायतची किंवा पोलिसांची परवानगी नाही तसेच कोणतीही अधिकृत पावती नाही अशा प्रकारे रस्त्याच्या शेजारी उभ्या केलेल्या कार वरती पार्किंग चार्ज लावून जोर जबरदस्तीने पैसे वसूल केले जातात. ही सर्व गोष्ट स्थानिक पोलीस स्टेशनच्या किंवा ग्रामपंचायतीच्या तसेच मंदिर विश्वस्ताच्या नजरेत येत नाही का? असा सवाल देवदर्शनाला येणाऱ्या भाविकांनी केला आहे. देवस्थान परिसरात बेकायदेशीर लॉजिंग बोर्डिंग तसेच जुगार-मटका व विनापरवाना दारू ही विकली जाते. ही बाब पोलिसाला दिसूनही जाणीवपूर्वक या विषयाकडे दुर्लक्ष करतात. या विषयावर गावातील प्रशासन म्हणून ग्रामपंचायत सरपंच व त्यांच्या सभासदांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्याचा विचार केला पाहिजे. फक्त येणाऱ्या जाणाऱ्या किंवा यात्रेत दुकान व्यवसाय करायला लोकांकडून पावत्या फाडून कर वसूल करणे हे काम ग्रामपंचायत एवढेच नाही तर येणाऱ्या भाविकांना त्यांना त्रास होऊ नये याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

## पोषण पखवाडामध्ये कुपोषण...

सुपोषित बालक-तेजस्वी भारत या उद्दिष्टाला साधण्यासाठी महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'पोषण पखवाडा २०२५' या जनजागृती मोहिमेच्या सांगता समारंभाला जिल्हा कार्यक्रमाधिकारी व प्रकल्प अधिकारी प्रवीण भावसार, अंगणवाडी प्रमुख सेविका तृप्ती भोये-भडांगे, पालघर बीटमधील सर्व अंगणवाडी सेविका, स्थानीय पालक वर्ग तसेच बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमांतून बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्य शिक्षण, पालकांचे पोषणविषयक प्रबोधन तसेच अंगणवाडी सेविकांचे कार्य कौशल्य समाजासमोर प्रभावीपणे आले. यावेळी कुपोषणा व त्याचे होणारे दुष्परिणाम बाबत लोकांना जागृत करणे व योग्य पोषण आहार व जीवनशैली स्वीकारण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गर्भवती महिलांना नऊ महिन्यापर्यंत व त्यानंतर लहान बालकांना तीन वर्षापर्यंत घरपोच पोषण आहार प्रशासनाकडून दिला जातो. यामध्ये पौष्टिक पदार्थ नाचणीचे पीठ, राजगिऱ्याचे पीठ अशा पोषक पदार्थांचा समावेश असतो. मात्र अनेक पालक तो आहार घेत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या घरपोच आहारापासून पालकांनी स्वतः पाककृती प्रात्यक्षिक बनवून इतर पालकांना घरपोच आहर घेण्याबाबत प्रोत्साहित करण्यात आले. कुपोषण मुक्तीसाठी १३० ग्रामपंचायतींमध्ये पंधरा दिवसात पोषण पखवाडा राबविण्यात आला. उपस्थित पालकांना अंगणवाडी सेविकांनी पौष्टिक पदार्थ बनवून आहार सुधरवण्याबाबत जागृत केले. पोषण ट्रॅकर ॲपमध्ये लाभार्थ्यांनी स्वतःच्या मोबाईल मधून नोंदणी करण्यास मार्गदर्शन केले तसेच बालकांची वजन व उंचीची देखील यावी नोंद करण्यात आली.

## जिल्ह्यात प्लास्टिक मुक्तीसाठी विशेष...

यामध्ये स्वच्छतेसाठी घोलवड (डहाणू), स्व उत्पन्न वाढीसाठी सालवड (पालघर), महिला स्नेही योजनांसाठी कोंडगाव (विक्रमगड), जलसंधारण प्रकल्पांसाठी आमगाव (तलासरी), सेवा हक्क अधिनियम साठी अर्नाळा (वसई), पेसा कायदा अंमलबजावणीसाठी कुरलोट (मोखाडा), वन हक्क आढावा साठी कासाटवाडी देवीचा पाडा (जव्हार) व माझी वसुंधरा अभियान राबवण्यासाठी खानिवली (वाडा) ग्रामपंचायत प्रतिनिधींना गौरविण्यात आले.

## भिवंडी महापालिकेतील भ्रष्टाचार...

प्रमुख महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना प्रदेश उपाध्यक्ष संतोष साळवी यांनी केला आहे. त्यासोबत पालिका कर्मचाऱ्यांना कोणत्याही विभागात प्रभारी पदन्नोती देताना सेवा जेष्ठते प्रमाणे व संबंधित अधिकाऱ्याच्या मागील कामांची पार्श्वभूमी तपासूनच प्रभारी पदन्नोती द्यावी, त्यामध्ये निलंबित, लाचखोर भ्रष्टाचारी व कामात कसूर करणारे अधिकारी किंवा कर्मचारी यांना कोणतीही जबाबदारी देऊ नये, सफाई कर्मचारी यांना सर्व हजेरी शेड वर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन द्यावी व सुरक्षेच्या दृष्टीने साहित्य उपलब्ध करुन द्यावेत, सेवा निवृत झालेल्या कर्मचारी यांची सर्व प्रकारची आर्थिक देणी सेवा निवृतीच्याच दिवशी अदा करण्यात यावी या मागण्यासाठी हे उपोषण आंदोलन सुरू केले आहे. या बाबत पालिका प्रशासन आयुक्त सकारात्मक उत्तर देत नाहीत योग्य ती कारवाई करीत नाहीत तो पर्यत ही उपोषण सुरू राहील असा निर्धार संतोष साळवी यांनी व्यक्त केला आहे.

## विरार येथील 'श्री जीवदानी देवी ...

समयी नवदांपत्यास शुभ आशीर्वाद देण्यासाठी माजी महापौर राजीव पाटील, जीवदानी देवी संस्थांचे अध्यक्ष प्रदीप तेंडोलकर, उपाध्यक्ष पंकज ठाकूर, माजी ठाणे जिल्हा परिषद अध्यक्ष काशिनाथ पाटील, जीवदानी मंदिर विश्वस्त मंडळ, माजी नगरसेवक, समाजातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. यावेळी नवदांपत्यास जीवदानी देवी संस्थान तर्फे मणी मंगळसूत्र, वर वधू दोघांनाही पेहराव, पॅन्ट पीस, शर्ट पीस, साडी, संसार उपयोगी भांडी - ताट, वाटी, तांब्या, ग्लास, पेला, वाटी,स्टील टाकी, हंडा, कळशी, परात, मसाला डब्बा, टिफिन डब्बा, कुकर, थर्मास, बेडशीट, ब्लँकेट, चटई इत्यादी वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या.

# तारापूर मधील दोन रासायनिक कारखान्यांवर उत्पादन बंदीची कारवाई

**बोईसर/प्रतिनिधी**

औद्योगिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या तारापूर औद्योगिक क्षेत्रातील दोन रासायनिक कारखान्यांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने उत्पादन बंदीची कारवाई केली आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील सगित्ता प्रायव्हेट लिमिटेड आणि हिमसन केमिकल इंडस्ट्रीज या दोन रासायनिक कारखान्यांना औद्योगिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाटी लावल्याप्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उत्पादन बंदीची कारवाई करण्यात आली आहे. भूखंड क्रमांक एन. तीन आणि चार वरील सगीत्ता प्रा. ली. या कारखान्याची तारापूर येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ च्या अधिकाऱ्यांनी १२ फेब्रुवारी रोजी अचानक तपासणी केली होती. अधिकाऱ्यांना स्थळ पाहणी दरम्यान औद्योगिक सांडपाणी विना प्रक्रिया बेकायदेशीरपणे थेट कारखाना आवारात विल्हेवाट लावत असल्याचे आढळून आले होते. याप्रकरणी अधिकाऱ्यांनी सांडपाण्याचे नमुने ताब्यात घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले होते. प्रयोगशाळेच्या अहवालात आम्लयुक्त रासायनीक सांडपाणी असल्याचे अहवाल दिला होता. त्यानुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनी व्यवस्थापनाला आपले म्हणणे सादर करण्यासाठी प्रथम कारणे दाखवा नोटीस व त्यानंतर अंतरिम नोटीस बजावून सुनावणी घेतली होती. सुनावणी मध्ये कंपनी व्यवस्थापनला कंपनी आवारात रासायनिक सांडपाण्यांचे उघड्यावर सुरू असलेल्या विल्हेवाटी बाबत समाधानकारक म्हणणे मांडता न आल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाने रासायनिक सांडपाण्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावून जल प्रदूषणास कारणीभूत आणि पर्यावरणाचे नुकसान केले प्रकरणी जबाबदार धरत उत्पादन बंदीची कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक एन- ७५ वरील हिमसन केमिकल इंडस्ट्रीज या कारखान्याचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असून कारखान्यातील औद्योगिक सांडपाण्याची कारखान्याबाहेरील गटारामध्ये बेकायदा विल्हेवाट लावीत असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पाहणीत आढळून आल्याप्रकरणी उत्पादन बंदीची कारवाई करण्यात आली आहे. एमआयडीसी आणि महावितरणला या दोन्ही कारखान्यांचे पाणी आणि वीज पुरवठा खंडित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



तारापूर औद्योगिक क्षेत्र आणि परिसरात औद्योगिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाट लावण्याचे प्रकार सुरूच आहेत. खैरापाडा येथील घरगुती सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारामध्ये रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत टँकर मधून आम्लयुक्त रसायनाची बेकायदा विल्हेवाट लावण्याचा प्रकार शुक्रवारी सकाळी उघडकीस आला. गटारात टाकलेल्या आम्लयुक्त रसायनामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरल्याने रहिवाशांना त्रास सहन करावा लागला. तारापूर औद्योगिक परिसरातील नाले, ओहोळ, खाडी, निर्जन जागेत औद्योगिक सांडपाण्याची बेकायदेशीर विल्हेवाट वाट लावणाऱ्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी मागील आठवड्यात घेतलेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानंतर देखील अज्ञात कारखान्यांकडून औद्योगिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाट लावण्याचे प्रकार सुरूच आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील जल आणि वायू प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई सुरू आहे. सगित्ता प्रा. ली. आणि हिमसन केमिकल इंडस्ट्रीज या उद्योगाकडून औद्योगिक सांडपाण्याची बेकायदा विल्हेवाट लावताना आढळून आल्याने त्यांच्यावर उत्पादन बंदीची कारवाई करण्यात आली आहे, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तारापूर १ चे उप प्रादेशिक अधिकारी राजू वसावे यांनी स्पष्ट केले.

## पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याचा वाड्यात महाविकास आघाडीतर्फे निषेध



**वाडा** : जम्मू कश्मीर येथील बैसरन भागात हिंदू पर्यटकांवर गोळीबार करून २६ जणांना ठार मारले, याचे पडसाद देशभर उमटले असून सर्वत्र या घटनेचा निषेध नोंदवला जात आहे. गुरुवारी (दि.२४) वाडा बस स्थानका समोर महाविकास आघाडीच्या वतीने घोषणा देऊन या घटनेचा जाहीर केला. काँग्रेस पार्टीचे पालघर जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील यांनी अतिरेक्यांची कडाडून टिका करून या आरोपींना लवकरात लवकर व कठोर शिक्षेची मागणी केली. त्याच बरोबर पत्रकार युवराज ठाकरे व शिवसेनेचे (उबाठा) निलेश गंधे यांनीही या भ्याड हल्ल्याचा प्रखर शब्दात निषेध नोंदवला. याप्रसंगी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाडा तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक




वाडा : वाडा तालुका काँग्रेस अंतर्गत तालुका निहाय (ब्लॉक) अध्यक्ष आणि त्यांच्या गठीत कमिटीची संघटनात्मक रचनेचा आढावा घेण्यासाठी प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशनानुसार वाडा तालुक्यातील गांध्रे येथे संघटनात्मक आढावा बैठक घेण्यात आली. सदर आढावा बैठकीत काँग्रेस कमिटीचे निरीक्षक विक्रांत चव्हाण व जिल्हा प्रभारी यशवंत ठाकूर यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करताना पक्ष वाढीसाठी प्रयत्न करण्या बाबत मार्गदर्शन केले. पालघर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रफुल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वाडा तालुका आढावा बैठका घेण्यात आली या बैठकीस काँग्रेस कमिटीचे निरीक्षक विक्रांत चव्हाण व जिल्हा प्रभारी यशवंत ठाकूर हे उपस्थित होते. तालुक्यातील सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आढावा बैठकीचे आयोजन वाडा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीप पाटील व वाडा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुशील पातकर यांनी केले होते.

## भिवंडी पद्मानगर भाजी मार्केट येथे पाकिस्तान झेंडा व पुतळा जाळून निषेध



**भिवंडी/प्रतिनिधी**

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे पाकिस्तानी आतंकवाद्यांनी पर्यटनासाठी आलेल्या हिंदु पर्यटकांवर भ्याड हल्ला करून निष्पाप नागरिकांचा बळी घेतला आहे. या हल्ल्याचा जगभरातून आक्रोश करून निषेध व्यक्त केला जात आहे. भिवंडी शहरात पद्मानगर भाजी मार्केट येथे सकल हिंदू समाजातर्फे मृत पर्यटकांना श्रद्धांजली वाहत असतानाच पाकिस्तानी आतंकवाद्यांचा निषेध करीत पाकिस्तानी झेंडा तसेच पाकिस्तानी पुतळा जाळून आपला आक्रोश व्यक्त केला.यावेळी माजी नगरसेवक संतोष शेट्टी, सुमित पाटील, निष्काम भैरी यांसह मोठ्या संख्येने स्त्री पुरुष विद्यार्थी सहभागी झाले होते. पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा निषेध करत पाकिस्तान विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आपला आक्रोश व्यक्त करीत नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी कठोर पावले उचलून जम्मू काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत होत असलेल्या अतिरेकी कारवायांना करारा जवाब देण्याची मागणी केली आहे.

## परिमंडळ १ बनले स्मार्ट; पोलीस ठाण्याचे नूतनीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ मध्ये स्मार्ट पोलिसिंग ही संकल्पना यशस्वी पणे राबविण्यात आली आहे. पोलीस ठाण्यांचे नूतनीकरण करण्याबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध उपक्रम राबिवण्यात आले. त्यामुळे परिमंडळ १ आणि त्या अंतर्गत येणाऱ्या ७ पोलीस ठाण्यांना आयएसओ नामांकन मिळाले नाहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात एकूण ३ परिमंडळे आहेत. त्यापेकी मिरा रोड येथे परिमंडळ १ आहे. त्यात ३ सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालये आणि ७ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. या परिमंडळात ७ कलमी कार्यक्रमांचे आयोजन करुन कार्यालये व पोलीस ठाणे यांना स्मार्ट बनविण्याची संकल्पना राबविण्यात आली होती. त्यानुसार पोलीस प्रशासन सामान्य नागरीकांसाठी अधिक अनुकूल बनविण्यात आले. अधिक प्रशिक्षित पोलीस दल आणि पोलीसींगमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर करण्यात आला आहे. याबाबत माहिती देताना पोलीस उपायुक्त (परिमंडळ १) प्रकाश गायकवाड यांनी सांगितले की आम्ही सर्व पोलीस ठाण्यांचे रुप पालटले आहे. पोलीस ठाण्याचे नूतनीकरण करण्यात आले आहे. कालबाहय अभिलेख अद्ययावत करण्यात आला. त्यामुळे कुठलाही दस्तावेज अवघ्या १ मिनिटात मिळतो. बेवारस वाहनांचा लिलाव करण्यात आला. नो प्लॅस्टिक झोन व ग्रिन ऑक्सीजन झोन कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. सायबर क्राईम जनजागृती, अर्थिक गुन्हेगारी, महिला सुरक्षा आणि सर्वसाधरण संबंधित विषयांवर विविध पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांच्यासाठी १०० हुन अधिक कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे परीमंडळ १ मिरारोड कार्यालयास (अ++) मानांकन मिळाले आहे. तसेच नवघर आणि मिरा रोडच्या सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयत तसेच काशिमिरा, मिरा रोड आणि नवघर पोलीस ठाण्याला (अ++) नामांकन मिळाले आहे. पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नागरीकांशी चांगले वागावे याकरिता त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणानंतर काही बदल झाला आहे का त्याची तपासणी वरिष्ठांनी केली. मी व्यक्तीश: ६८ अभ्यागतांना दूरध्वनी करून कशी वागणूक मिळाली याची माहिती घेतली त्यापैकी सर्वांनी चांगला अनुभव आल्याचे सांगितले असे काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले.




## नवीन इमारत ही गावाच्या विकासाच्या दिशेने टाकलेले महत्वपूर्ण पाऊल- सवरा



वाडा : या इमारतीच्या माध्यमातून ग्रामस्थांना सेवा अधिक सुलभ पद्धतीने उपलब्ध होतील, ही इमारत गावाच्या विकासाच्या दिशेने टाकलेले महत्वपूर्ण पाऊल आहे. असे उदगार पालघर जिल्ह्याचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी काढले ते वाडा तालुक्यातील खरिवली, आपटी तर्फे कोहोज ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. या प्रसंगी आमदार हरीश्चंद्र भोये यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## वाडा बस स्थानकातील पाणपोईची दुरावस्था




**वाडा/प्रतिनिधी**

कडाक्याचा उन्हाळा सुरु सताना दुपारच्या सुमारास ४३ अंश सेल्सिस एवढे तापमान असताना अंगाची लाही लाही होते अशा वेळी तहान लागून पाण्याची आठवण आल्या शिवाय राहवत नाही, वाडा बस स्थानकात काही वर्षापूर्वी येथील स्थानिक व्यापाऱ्याने स्वच्छ व थंड पाण्याची सोय करून दिली होती. मात्र ही मशीन ना दुरुस्त झाल्याने व साधे पाणी सुद्धा नसल्याने या पाणपोईची दुरावस्था झालीच आहे. बस मधून प्रवास करणारे सर्वच प्रवासी दहा,विस रुपयांची पाण्याची बाटली विकत घेऊ शकत नाहीत. अशा वेळी ते या पाणपोईकडे येतात पण पाणी नसल्याचे पाहून सुकलेल्या ओठ व आणि घश्याने परत जातात. ही पाणपोई स्वच्छ करून त्यात पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी प्रवासी करत आहेत.

## संघर्ष, सातत्य, संयम व चिकाटी हे स्पर्धा परीक्षेच्या यशाचे गमक -डॉ.महादेव इरकर



**विरार/प्रतिनिधी**

विविध अभ्यासक्रमांचे प्रवेश आणि वेगवेगळ्या शासकीय सेवांच्या निवडीसाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि परीक्षांची काठिण्य पातळी अधिक वाढत आहे. या स्पर्धा परीक्षांची तयारी दहावी, बारावीपासून केली तर लवकर यश मिळवणे शक्य होते आणि हाच एकमेव उद्देश समोर ठेवून विरारच्या विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टच्या कै. पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालय येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली होती. या व्याख्यानमालेच्या चौथे पुष्पाच्या 'शासकीय नोकरी आणि स्पर्धा परीक्षा' या विषयावर डॉ. महादेव दिनकर इरकर यांनी मार्गदर्शन केले. केंद्र आणि राज्य शासनाच्या अधिकारी पदासाठी असणारे संघ व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे भरती आयोग आणि केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध खात्यातील भरती मंडळांची निवड प्रक्रिया समजावून सांगितली. या कार्यक्रमासाठी प्राचार्या मुग्धा लेले, उपप्राचार्य सुभाष शिंदे, रमेश पाटील, हेमा पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख खोडिदास गोहिल आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान विभागातील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. पूनम चौधरी आणि प्रा. कथा कावले यांनी आभार मानले. या उपक्रमाला ट्रस्टचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर, ट्रस्टच्या सचिव अपर्णा ठाकूर, व्यवस्थापन समितीचे सदस्य संजीव पाटील, संजय पिंगुळकर, एस.एन पाध्ये, धन्वी किरण सोलंकी, समन्वयक नारायण कुट्टी, समन्वयक कल्पना राऊत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## पालघरमध्ये मुस्लिम समाजाकडून जोरदार निषेध




**पालघर** : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज पालघर शहर मुस्लिम समाजाच्या वतीने शहरातील जामा मशिदेच्या बाहेर दु.२.०० वाजता शुक्रवारची नमाज पठण केल्यानंतर निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी असंख्य मुस्लिम बांधव उपस्थित होते. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यानंतर सम्पूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. ठिकठिकाणी निषेध करण्यात येत आहे. पालघरमध्येही समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने या हल्ल्याच्या निषेधार्थ जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी मुस्लिम समाजातील बांधवांनी हातावर काळी फीत बांधून पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण केली. या दरम्यान पाकिस्तान मुर्दाबाद, व पाकिस्तानवर कारवाई करा व गुन्हेगारांना शिक्षा द्या, अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी पाकिस्तान देशाचा राष्ट्रध्वज फाडून पेटवण्यात आला. यावेळी दहशतवाद्यांचा कायमचा बिमोड करण्याची मागणी उपस्थित आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली.

## सापरोंडे, मांगाठणे ग्रुप ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच लाचलूचपतच्या जाळ्यात

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील सापरोंडे, मांगाठणे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच शोभा सुनिल गवारी यांना रोख १९ हजार रुपयांची लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे युनिटने अटक केली आहे. यातील तक्रारदार (वय २४) यांनी ग्रामपंचायत कार्यालय विस्तारिकरण करण्याच्या कामाचे मंजूर केलेल्या बिलाच्या रकमेपैकी २ टक्के प्रमाणे एकूण वीस हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे सरपंच गवारी यांच्याविरुद्ध लाच मागणीची तक्रार नोंदवलेली होती. तक्रारीच्या अनुषंगाने (दि.२४) तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीप्रमाणे पंचासह इलोसे यांचेकडे पडताळणी करिता पाठविण्यात आले होते. यातील इलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे वीस हजार रुपये लाचेची मागणी स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती. म्हणून शुक्रवारी (दि.२५) करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हे लाचेची रक्कम आरोपी यांना देणे करिता गेले असता, आरोपी यांनी स्वतः तक्रारदार यांच्याकडून तडजोडी अंती १९ हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारलेली आहे. आरोपीचे अंग झडती मध्ये लाचेची रक्कम १९ हजार रुपये व एक मोबाईल जप्त केला असून आरोपीस अटक केली आहे. पोलीस अधीक्षक ला.प्र.वी. ठाणे परिक्षेत्र, ठाणे शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक संजय गोविलकर अपर पोलीस अधीक्षक सुहास शिंदे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष अंबिके, महिला हवालदार शेख, पोलीस हवालदार विशे, मपोशि. सुरवाडे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी सापाळ रचून कारवाई केली आहे. तसेच नवी मुंबई, रायगड, ठाणे येथील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खासगी इसम (एजंट ) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे टोल फ्री क्रमांक १०६४ दूरधनी क्रमांक ०२२-२७८३३३४४ या क्रमांकावर संपर्क साधन्याचे आवाहन केले आहे.

## पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध व मृतांना श्रद्धांजली!




**नालासोपारा/प्रतिनिधी**

काश्मीर मधील पहलगाम येथे काल निष्पाप पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्याचा निषेध करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने नालासोपारा येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपस्थित शिवसैनिक व नागरिकांनी ह्या हल्ल्याच्या निषेधार्थ फलक हातात घेऊन जाहीर निषेध नोंदवला. याप्रसंगी शेकडो नागरिकांनी भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रविण म्हाप्रळकर म्हणाले, दहशतवाद हा राष्ट्रासाठी एक शाप असून तो कायमस्वरूपी नष्ट करायलाच हवा. केंद्र सरकारने पहलगाम हल्ल्याचा कडाडून जबाब दिला पाहिजे. शांतीसाठी सर्वांनी एकत्र येऊन दहशत वादाला हरवले पाहिजे असेही ते म्हणाले. याप्रसंगी लोकसभा संघटक पंकज देशमुख, जिल्हाप्रमुख प्रविण म्हाप्रळकर, उपजिल्हा संघटक भारती गावडे, विधानसभा संघटक राज सिंग, प्रणब खामकर, शहर संघटक पवित्रा चंदा, युवा सेनेचे रोहन चव्हाण, प्रतीक जाधव, ऍड. रोहन पाठारे तसेच अनेक शाखाप्रमुख, विभाग प्रमुख, उपशहर प्रमुख आणि शेकडो शिवसैनिक व नागरिक यावेळी उपस्थित होते.

## कळवा खाडीत व्यक्तीचा मृतदेह आढळला

ठाणे : कळवा येथील पारसिक रेतीबंदर खाडीत बुधवारी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची नोंद कळवा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांनी हा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे. मृताची ओळख अद्याप पटली नसल्याची माहिती कळवा पोलिसांनी दिली. कळवा येथील गणपती विसर्जन घाट जवळ असलेल्या पारसिक-रेतीबंदर खाडीमध्ये एका अज्ञात पुरुषाच्या (४०) मृतदेह खाडीच्या किनाऱ्या जवळ आढळला. यावेळी पोलिस कर्मचारी आणि स्थानिक नागरिक यांच्या मदतीने खाडीतील मृतदेह बाहेर काढण्यात आला. कळवा पोलीस कर्मचारी यांच्या ताब्यात हा मृतदेह देण्यात आला आहे. या व्यक्तीचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे.

28 APRIL TO 04 MAY 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 4/26/2025 8:21 PM Page 1



# आपत्कालीन परिस्थितीसाठी पालघर जिल्हा प्रशासन सज्ज




**वसई/प्रतिनिधी**

आगामी मान्सून काळात संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी आवश्यक ती तयारी सुरू असून आपत्कालीन परिस्थितीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. मान्सूनपूर्व आढावा बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे करण्यात आले यावेळी पालकमंत्री नाईक बोलत होते. या बैठकीस खा. डॉ. हेमंत सावरा, आ. नेहा दुबे, आ. राजन नाईक, आ.हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वसई विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिल पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अपूर्वा बासुर, खत्री, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विवेकानंद कदम तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग, महापालिका, आरोग्य, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, महावितरण तसेच रेल्वे, पोलीस व इतर संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.पावसाळ्यामध्ये धरणाचे पाणी नदीच्या पात्रात सोडण्यापूर्वी नदी काठावरील गावामध्ये दवंडी देऊन गावकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन ग्रामपंचायत स्तरावरून करावे. तसेच पावसाळ्यामध्ये रेल्वेवाहतूक सुरळीत सुरू राहण्यासाठी रेल्वे विभागाने पावसाळ्यापूर्वी ज्या ठिकाणी पाणी जमा होते. अशा ठिकाणी भराव करावा, रेल्वेसेवेमध्ये कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले. वादळी वाऱ्यांचा इशारा हवामान विभागाने दिल्यावर मत्स्य व्यवसाय विभागाने तात्काळ मच्छीमारांना समुद्रात जाण्यापासून रोखावे, जे मच्छीमार समुद्रात गेले असतील त्यांना सुरक्षित किनाऱ्यावर आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात तसेच पावसाळ्यात एखादी परिस्थिती उद्भवली असता नजीकच्या शाळेत स्थानिकांची राहण्याची सोय करता येण्यासाठी ज्या शाळा सुस्थितीत नसतील पावसाळ्यापूर्वी अशा शाळा दुरुस्त करून घ्याव्यात, तसेच डहाणू आणि जव्हार येथील प्रकल्प अधिकारी यांनी आश्रमशाळा सुस्थितीत आहेत का? याची पाहणी करून त्या सुस्थितीत कराव्यात. असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिलेकृषी अवजारे, बी बियाणे आणि खते यांचा मुबलक साठा उपलब्ध असून शेतकरी बांधवांना बी बियाणेआणि खते कमी पडणार नाहीत, असे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. कृषी आणि वन विभाग यांनी संयुक्तरीत्या सुरंगी या सुगंधित झाडाची लागवड करावी एक सुरंगीचे झाड १०० एकर परिसरामध्ये सुगंध देते, अशा महत्त्वपूर्ण झाडाची लागवड कृषी आणि वन विभाग यांनी करावी असे निर्देश कृषी आणि वन विभागाला पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिले. पंचायत राज दिनानिमित्त खानिवडे ग्रामपंचायत यांनी उत्कृष्ट काम केल्याबद्दल पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## आईच्या अतिक्रमणामुळे मुलाने गमावले सरपंचपद

# शिरगाव ग्रामपंचायतीचे घन:श्याम मोरे ठरले अपात्र



**पालघर/प्रतिनिधी**

सरकारी गुरचरण जमिनीवर आईने केलेल्या अतिक्रमणामुळे सरपंचाला आपले पद गमावावे लागण्याची घटना पालघर तालुक्यातील शिरगाव ग्रामपंचायतीत घडली आहे. सरपंच घन:श्याम मोरे यांना पदासाठी अपात्र ठरवण्याचा महत्त्वाचा आदेश कोकण विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांनी सोमवारी दिला. शिरगाव ग्रामपंचायतीचे सरपंच घन:श्याम मोरे यांची आई सरोज मोरे यांनी शिरगाव येथील सरकारी गुरुचरण जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केल्याची तक्रार करण्यात आली होती. यामुळे घन:श्याम यांचे सरपंचपद रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज प्रणय राऊत यांनी केला होता. पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी २४ सप्टेंबर, २०२४ रोजी हा अर्ज अमान्य केला. त्यामुळे मोरे यांचे पद अबाधित राहिले होते. मात्र त्या निर्णयाविरोधात प्रणय राऊत यांनी विभागीय आयुक्त, कोकण भवन यांच्याकडे अपील दाखल केले होते. त्यावर २६ नोव्हेंबर, २०२४ ते २७ जानेवारी, २०२५ या कालावधीमध्ये दोन्ही बाजूंच्या वकिलांनी युक्तिवाद केला. मात्र, पालघरच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच मोरे अथवा त्याच्या कुटुंबीयांनी अतिक्रमण कायम ठेवले आहे का, याबाबत प्रत्यक्ष शहानिशा न करता अपीलकर्त्याचा दावा अमान्य केल्याचे मत विभागीय आयुक्तांनी नोंदवले. बेकायदा बांधकाम हटवण्याची कार्यवाही केली असली, तरी अतिक्रमण केल्याचे सिद्ध होत असल्याचे मान्य करण्यात आले. हे अपील ग्राह्य धरत पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत अधिनियम कलम १४ (१)(ज)(३) अन्वये दिलेले आदेश रद्द केले. घन:श्याम मोरे यांना सरपंच पदावरून हटवण्यात येत असल्याचा निकाल कोकण विभागाचे अतिरिक्त विभागीय आयुक्त विकास मारुती पानसरे यांनी दिला. बोईसर औद्योगिक परिसरालगतच्या पाम व टेंभी या गावांमध्ये सरकारी जमिनींवर मोठ्या प्रमाणात ...पान ६ वर

## सर्वसामान्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत राहणार -आ.रमेशआप्पा कराड




**लातूर/प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पावलावर पाऊल ठेवून आजपर्यंत चालण्याचा, गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. रेणापूर तालुक्याने मला भरभरून दिले या तालुक्याचे उपकार आयुष्यात कधीच मी विसरू शकत नाही. दर तीन महिन्याला प्रत्येक तालुक्यात जनता दरबार घेऊन सर्व सामान्यांच्या हक्कासाठी, सर्वांगीण विकासासाठी कार्यरत राहणार अशी ग्वाही लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी दिली. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचा ऐतिहासिक विजय झाल्याच्या निमित्ताने रेणापूर तालुक्यातील मौजे तळणी येथे भाजपाच्या वतीने आयोजित मतदारांचे जाहीर आभार सभेत बोलताना आमदार कराड यांनी ग्वाही दिली. सभेचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक सिद्धेश्वरआप्पा कन्हेरे हे होते तर याप्रसंगी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख (शिंदे गट) अँड बळवंतराव जाधव, भाजपा युवा नेते ऋषिकेशदादा कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, सतीश आंबेकर, शरद दरेकर, दशरथ सरवदे, कुलदीप सूर्यवंशी, अभिषेक आकनगिरे, वसंत करमुडे, भास्कर लहाने, सुंदर घुले, रविकांत औसेकर, प्रताप पाटील, व्यंकटराव आनामे, गणेश तुरूप, सुकेश भंडारे, श्रीकृष्ण जाधव, लक्ष्मण यादव ओम चव्हाण, माधव घुले यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमात स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या सोबत काम केलेल्या २१ कार्यकर्त्यांचा यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आला. प्रारंभी तळणी येथील महिला भजनी मंडळांनी मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात आ.रमेशआप्पा कराड यांचे स्वागत केले. सभेला भाजपा कार्यकर्त्यांसह मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते गोपीनाथराव ...पान ६ वर

# अतिरेकी हल्ल्याचा वसईत भाजपाकडून पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेध







**वसई/प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाव येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वसईत भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात भारतीय जवानांचे मोठे नुकसान झाल्याने संतप्त भाजप कार्यकर्त्यांनी पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच पाकिस्तानचा झेंडा जाळून जाहीर निषेध नोंदवला. वसई रेल्वे स्थानक परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात भाजपचे स्थानिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी पाकिस्तान मुर्दाबाद, दहशतवादाचा नाश होवो अशा घोषणा देत देशविरोधी कारवायांना कठोर प्रत्युत्तर देण्याची मागणी केली. यावेळी बोलताना भाजप महाराष्ट्र प्रदेश, केरळ प्रकोष्ठ चे संयोजक उत्तम कुमार म्हणाले, देशातील अशा हल्ल्यांना मुळापासून चिरडण्यासाठी कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. काश्मिर मध्ये वाढलेले पर्यटन पाकिस्तानला बघवले नाही. पाकिस्तानला याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. देशात राहून देशाविरोधात षडयंत्र रचणाऱ्या काही राजकीय टोळ्यांचा प्रथम बंदोबस्त करणे गरजेचे आसल्याचे आजच्या घटनेवरुन दिसत आहे. आपले जवान बलिदान देत आहेत आणि पाकिस्तान मोकळेपणाने दहशतवाद्यांना पाठीशी घालत आहे. दहशतवादाविरोधात सरकार कठोर पावले उचलते तेव्हा रॉबर्ट वाड्रा सारखे लोक यांना मानवाधिकार आणि अल्पसंख्यांक आठवतात. कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या आतंकवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि या अमानवी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे म्हणत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश केरळ प्रकोष्टचे संयोजक उत्तम कुमार नायर ...पान ६ वर

# विरार येथील 'श्री जीवदानी देवी संस्थान'च्या सामुदायिक विवाह सोहळ्या २५ जोडपी विवाहबद्ध




**विरार/प्रतिनिधी**

श्री जीवदानी देवी संस्थान, विरार यांच्यातर्फे दरवर्षीप्रमाणे विनामूल्य सामुदायिक विवाह सोहळा सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ रोजी मान्यवराच्या उपस्तिथीत पार पडला. श्री जीवदानी देवी संस्थान तर्फे दरवर्षी वर्षातून दोन सामुदायिक विवाह सोहळा पार पाडले जातात. समाजातील गोरगरीब लोकांसाठी मदतीचा हातभार म्हणून हे सोहळे विनामूल्य पार पाडले जातात. या सामुदायिक विवाह सोहळ्यात २५ जोडपी सहभागी झाली होती. गोरगरीब लोक आपल्या मुलांच्या लग्नासाठी कर्ज घेऊन लग्न लावुन देतात व नंतर ते कर्ज फेडण्यासाठी कर्जाच्या विळख्यात सापडतात. असे होऊ नये म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा उपक्रम जीवदानी मंदिर तर्फे बोईसर,डहाणू, तलासरी विक्रमगड, जव्हार या तालुक्यातील आदिवासी बांधवासाठी नोव्हेबर, डिसेंबर मध्ये एकदा व एप्रिल मे मध्ये वसई, पालघर, वाडा, भिवंडी, शहापूर, मुरबाड या तालुक्यातील लोकांसाठी श्री जीवदानी मंदिर येथे एकदा असे वर्षातून दोनदा हा सोहळा आयोजित केला जातो.. यावर्षी २५ जोडपी विवाह बंधनात जोडली गेली. या मंगल ...पान ६ वर

## 'युपीएससी' परीक्षेतील संपदा वांगे हिचे यश ओबीसींसाठी अभिमानास्पद -विक्रम गोमगुंडे



**लातूर/प्रतिनिधी**

संपदा वांगे हीने ग्रामीण भागात राहून युपीएससीसारख्या कठीण परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करून लातूर जिल्ह्यातील शिक्षणाच्या पॅटर्नला झळाळी प्राप्त करून दिलेली आहे. त्याचबरोबर तिला मिळालेले यश हे तमाम ओबींसीसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगून संपदा हिने भावी आयुष्यात जिल्हाधिकारी व्हावे, अशा शुभेच्छा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांनी दिल्या. जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात असलेल्या नारवट वाडी येथील संपदा धर्मराज वांगे हिने युपीएससी परीक्षेत उत्तम यश प्राप्त केले. या यशाबद्दल माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे वांगे परिवाराची भेट घेवून संपदा हीचा सत्कार करत तिला शुभेच्छा दिल्या. संपदा वांगे हिने नारवट वाडीसारख्या छोट्याशा गावात राहून घरात स्पर्धा परिक्षाची पार्श्वभूमी नसता जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर युपीएससीसारख्या अवघड परीक्षेत यश प्राप्त केले आहे. तिचे प्राथमिक ...पान ६ वर

# वज्रेश्वरी देवस्थान परिसरात पार्किंगच्या नावाखाली भक्तांची लूट






**ठाणे/लक्ष्मणराव पाटोळे**

ठाणे जिल्ह्यातील वज्रेश्वरी येथील वज्रेश्वरी मातेचे मंदिर हे प्रसिद्ध आहे. नेहमीच भक्तांची गर्दी असते. सध्या वज्रेश्वरी देवीच्या सालाबाद प्रमाणे यंदाही वर्षी यात्रा सुरू आहे. या यात्रेसाठी महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे तसेच ठाणे, पालघर, मुंबई या शहरातूनही भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी करतात. दिवसाला हजारो लोक देवीच्या दर्शनासाठी आलेली असतात. मात्र वज्रेश्वरी ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची भाविकांसाठी सुख सुविधा केलेली नाही. मात्र देवदर्शनाला येणाऱ्या भाविकांची लूटमार होत असल्याचे भक्तांचे म्हणणे आहे. सध्या यात्रा सुरू असल्यामुळे गावातीलच गावकरी लोक येणाऱ्या भाविकांसोबत अरे तूरेची भाषा करू त्यांना दम देत आहेत. मग ते देवदर्शनाचे ताट घेणे असो किंवा मुलांसाठी खेळणी घेणे असो या रोडच्या कडेला गाडी पार्किंग करणे असो. तसे बघायला गेले तर ग्रामपंचायतीने गावची यात्रा असताना येणाऱ्या वाहनासाठी पार्किंग झोन दिला पाहिजे. जागोजागी लोकांना पाणी पिण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे मात्र याठिकाणी असे काही ...पान ६ वर

## पोषण पखवाडामध्ये कुपोषण मुक्तीवर भर

### पौष्टिक आहाराबाबत १३० अंगणवाड्यांमध्ये उपक्रम



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात कुपोषण मोठ्या प्रमाणात असून ग्रामीण भागासह शहरी भागातील १३० अंगणवाड्यांमध्ये पोषण पखवाडा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमादरम्यान जिल्ह्यातील कुपोषण रोखण्यासाठी माता आणि अर्भकांचे पोषण, लाभार्थ्यांसाठी डिजिटल सुलभता आणि बालपणीच्या लठ्ठपणाशी लढा या विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. ८ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान पालघर जिल्ह्यातील विविध अंगणवाड्यांमध्ये पोषणविषयक उपक्रमांची मालिका राबविण्यात आली. यामध्ये पहिल्या १००० दिवसांचे महत्त्व, पोषण ट्रॅकरद्वारे लाभार्थ्यांची डिजिटल नोंदणी, कुपोषणमुक्तीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, अतिलठ्ठपणावर प्रतिबंधात्मक उपाय यावर विशेष भर देण्यात आला. या पोषण पखवाडा २०२५ चा सांगता समारंभ २२ एप्रिल रोजी पालघर येथे उत्साहात पार पडला. ...पान ६ वर

# जिल्ह्यात प्लास्टिक मुक्तीसाठी विशेष स्वच्छता मोहिमेची आखणी

**पालघर/प्रतिनिधी**

प्लास्टिक मुक्त दुर्गंधी मुक्त तसेच स्वच्छ सुंदर पालघर जिल्ह्याच्या निर्मितीसाठी जिल्ह्यात विशेष मोहीम राबवली जात असून त्याचे विधिवत उद्घाटन पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आज करण्यात आले. जिल्ह्यात प्लास्टिक बंदी सोबतच कचऱ्यातून गोळा केल्या जाणाऱ्या प्लास्टिकवर प्रक्रिया करण्यासाठी तालुकास्तरीय केंद्र उभारण्यात येत आहे. २८ मार्च रोजी झालेल्या जनता दरबारात प्लास्टिक मुक्त जिल्हा करण्याचा इरादा पालकमंत्री गणेश नाईक यांनी व्यासपीठावर व्यक्त केला होता. त्याअनुषंगाने २२ एप्रिल पासून १ मे पर्यंत जिल्ह्यात विशेष स्वच्छता मोहीम राबवली जात असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनातर्फे याप्रसंगी देण्यात आली. या अभियानाचे विधिवत उद्घाटन आज पालघर नगर परिषदेच्या हद्दीत करण्यात आले. जिल्ह्यातील ४७३ ग्रामपंचायत पैकी २७० ग्रामपंचायत अंतर्गत विशेष स्वच्छता अभियान राबवण्यात आले असून या अंतर्गत सहा टनापेक्षा अधिक कचरा



गोळा करण्यात आला आहे. या कचऱ्यामधील प्लास्टिक मुक्त घटकांची प्रक्रिया करण्यासाठी विशेष तालुकास्तरीय केंद्रांची उभारणी करण्यात आली असल्याची माहिती याप्रसंगी जिल्हा परिषदेतर्फे देण्यात आले. जिल्ह्यात प्लास्टिकवर बंदी आणण्यासाठी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची बैठक पुढील आठवड्यात आयोजित केली जाणार असून जिल्हा सुंदर करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन तसेच जिल्हा परिषद प्रशासन एकत्रितपणे काम करणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी याप्रसंगी सांगितले. प्लास्टिक मुक्तीच्या दृष्टीने जनजागृती करण्याच्या अनेक योजना केल्या जात असे विविध गावच्या लोकप्रतिनिधींना स्वच्छतेमध्ये नेत्रदीपक कमगिरी करणाऱ्या ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी पाठवण्यात येत आहे. गटविकास अधिकारी यांच्या मार्फत वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देऊन प्लास्टिक मुक्तीच्या दृष्टीने आपल्यात आलेल्या विविध उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील आठ ग्रामपंचायतीचा सत्कार पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते आज करण्यात आला. ...पान ६ वर

## भिवंडी महापालिकेतील भ्रष्टाचार, कामगारांच्या प्रलंबित मागण्यासाठी मनसे कामगार सेनेचे उपोषण




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील अमृत जल योजने अंतर्गतील १०० एमएलटी पाणीपुरवठा योजनेत झालेला भ्रष्टाचारास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच पालिकेतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या वतीने भिवंडी महापालिका मुख्यालय समोर संतोष साळवी यांच्या नेतृत्वाखाली उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले आहे. भिवंडी पालिका क्षेत्रात १०० एमएलडी पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे.त्या मध्ये निविदा प्रक्रिया राबविताना कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे.यामध्ये संबंधित भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. त्यामध्ये अनेक वेळा प्रशासना कडे तक्रार करून सुद्धा कोणतीही कारवाई केली जात नाही असा आरोप मनसे कामगार सेना भिवंडी युनिट ...पान ६ वर